म.ग्रं.सं., वाचनालय शाखा, ठाणे.
विषय : नाटक
दा.क्र. : 22224
22224

IRBK-0122225

वाचनालय
नाटक
२२२२५
१०।१०।८८

षड्ज

म. वा. सं. ठाणे. वाचनालय शाखा.
वा. क्र. २२२२५ दि. १०।१०।८८
वि. नाटक

## अच्युत वझे यांची नाटके

एक होता मधुकर

चल रे भोपळ्या टुणुक टुणुक

पावसाचं नाटक

लागला तर घोडा नाहीतर झेब्रा

षड्ज

सदू, सदूची बायको आणि उरलेलं जग

सायसाखर

सोफा कम बेड

षड्ज
पॉप्युलर प्रकाशन
( म–४१८ )

Shadja
( Marathi Play )
Achyut Vaze

© १९८७ अच्युत वझे

पहिली आवृत्ती १९८७/१९०९

आगाऊ लेखी परवानगीशिवाय या नाटकाचा कोणीही प्रयोग करू नये. तालमींना प्रारंभ करण्यापूर्वी संपर्क साधावा : सौ. चंदा वझे, ११ जयश्री, वरळी सी फेस, मुंबई ४०० ०२५.

प्रकाशक
रामदास भटकळ
पॉप्युलर प्रकाशन प्रा. लि.
३५सी, पं. मालवीय मार्ग
ताडदेव, मुंबई ४०० ०३४

मुद्रक
सौ. कमल रामचंद्र घळसासी
संजीव मुद्रणालय
४६९ सदाशिव पेठ
पुणे ४११ ०३०

खूप खूप वर्षांपूर्वी
जो बिलासपूरहून मुंबईला
आला क्रिकेट खेळायला
अन् नाटकांच्याच नादी लागला.

आजवर ज्यानं रंगभूमीवर
तऱ्हेतऱ्हेचे प्रयोग केले—
काही भन्नाट, काही नन्नाट
पण सगळे आगळेवेगळे.

आज मी मी म्हणणाऱ्या अनेकांना
ज्यानं घडवलं मेहनतीनं लाडानं
अन् भांडणं उकरून सुद्धा—
पण लावला नाही बांधायला
स्वतःच्या नावाचा गंडा.

अशा एका नाटकवेड्यास, प्रेमानं—

त्यांच्या तरुण वयाला कदाचित शोभेल असा– उदाहरणार्थ तरुणपणातील नोएल कॉवर्डसारखा– केवळ प्रस्थापिताची खिल्ली उडवण्यात आनंद मानणारा फ्लिपन्ट नाही. तर स्वभावपरत्वे तो गंभीर, सीरीअस आहे. जरी त्याची नाट्यशैली काहीशी उच्छृंखल भासली तरी. जीवनानुभवाचा काही एक विशेष अर्थ शोधण्याच्या नादात तो सदैव गढलेला असतो. ' षड्ज ' नाटकाने त्याने जो षड्ज लावला, तो विस्मयजनक होता.

' षड्ज 'चे नाट्यरूप बाह्यतः फार्सचे आहे. पण त्यातून व्यक्त होणारा ध्वन्यर्थ विलक्षण गंभीर प्रकृतीचा आहे. वर वर पाहिले तर ' षड्ज 'ची कहाणी एका सत्ताधीश अशा कोट्यधीशाची आहे. अविनाश हा कित्येक कारखान्यांचा संचालक–मालक आहे. आणि मध्यरात्र उलटून गेल्यावरही त्याला जे फोन्स सतत येत असतात, ते लाखा-लाखांच्या उलाढालींचे. त्याला जी सत्ता प्राप्त झाली आहे, ती त्याच्या संपत्तिमत्तेच्या परिणामी. त्या अनिर्बंध सत्तेचा उपभोग तो स्वतःच्या वैयक्तिक जीवनातही यथेच्छ घेत असतो. रात्रीचा त्याचा खासगत आयुष्यक्रमही त्याच्या दिवसभराच्या आयुष्यक्रमाशी सुसंगत असाच असतो. त्याला निद्रानाशाचा अपरिहार्य विकार जडलेला आहे. आणि त्याच्या डॉक्टरने प्रिस्क्राइब केलेल्या झोपेच्या गोळ्यांपेक्षा कित्येक अधिक रिचवूनही त्याला झोप कशी ती येत नाही. म्हणून रात्र रात्र स्वेच्छ स्वैराचारात घालवण्याची त्याला सवय जडलेली असते.

कोयना पणशीकर ही त्याची ' तरुण, बांधेसूद, सुंदर ' प्रायव्हेट सेक्रेटरी. वर्षभरापूर्वी कोणा भाबड्या पणशीकरशी तिचे लग्न झालेले असते. तरी दहा वर्षांपूर्वी त्याने तिला पैसे मोजून विकत घेतलेली असते. आणि तिच्या लग्नानंतरही तिच्यावरची त्याची सत्ता इतकी अप्रतिहत असते, की तिच्या लग्नाच्या वाढदिवशीसुद्धा मध्यरात्र उलटल्यावर तो तिला सहज फोन करून आपल्या फ्लॅटवर बोलावून घेतो– डिक्टेशन घेण्यासाठी. आणि ती पण आपल्या नवऱ्याची मिठी सोडवून तत्क्षणी त्याच्या सेवेत हजर होते. त्याला ती दररात्र हवीच असते. कारण तिच्याशी शृंगार करताना ' एका भांबावून गेलेल्या, काय घडतंय ह्याची जाणीव नसलेल्या चौदा वर्षांच्या भाबड्या पोरीवर आपण बलात्कार करतोय '– असे त्याला अजूनही वाटत असते. त्याच्या आज्ञेबरहुकूम ती जी येते, ती सरळ शय्यागृहातच जाते– अंगावरचे सर्व कपडे उतरवून तत्क्षणी त्याच्या सेवेत हजर होण्यासाठी.

कोयनेवरची त्याची अधिसत्ता इतकी सर्वंकष आहे की तो ' जे काही तिला करायला सांगतो, ते ते आपोआप ' तिच्याकडून ' घडत जाते. ' तो तिला स्वच्छच सांगतो की ' तू कधी रडायचं, कधी हसायचं, ते ठरवण्याचा अधिकार मला आहे. तुला नाही. ' त्याला झोप येत नाही म्हणून त्या उभयतांमधील रिच्युअलसारखे काही काही ठराविक खेळ ते खेळतात. ती त्याला मांडीवर घेऊन थोपटत कसल्या कसल्या राजा–राणी–राज-पुत्रांच्या गोष्टी सांगते, लहान पोरांप्रमाणे ती दोघे ' आजीबाई–आजीबाई,' डॉक्टर–डॉक्टर, भटो–भटो, अटक–मटक, अडगुलं–मडगुलं ' असले काही काही पोरकट खेळ खेळतात.

त्यातील एक म्हणजे जिनच्या बाटल्या सव्वीसाव्या मजल्यावरच्या बाल्कनीतून खालच्या रस्त्यात बेदरकार भिरकावण्याचा. हा खेळ अर्थातच अविनाशचा.

नंतर मग अनपेक्षित टपकतो तो राहुल. तोही कोयनेसारखाच पण त्याचा मेल कम्पॅनिअन. कोयना नसेल, तेव्हा तिच्या गैरहजेरीत त्याची गरज भागवणारा. कोयना असताना तो तेथे का अडमडतो ? तर त्याचे कारण ' इथं येणं माझ्या हातात थोडंच आहे ! '–आल्या आल्या तोसुद्धा ' आता काय खेळू या ? भेंड्या लावू ? गावांच्या ? का गाण्यांच्या ? '– असे विचारतो ! आणि अविनाशने कोयनेला खेळातच एखादे बिझिनेस-लेटर डिक्टेट केले की हा राहुल लगेच कमरेत वाकून तिच्या हाताखालचा टाइपरायटर होतो. कोयना व राहुल यांचे देह वेगळे असले, तरी त्यांची मने एकरूप आहेत. कोयना चक्क असे राहुलला म्हणते : ' अविनाश चक्क मनच गहाण मागतो. काही काहींना कॉम्प्रमाइज जमतो. काहींना जमत नाही. ज्यांना जमत नाही, त्यांचं मन, स्वतः विचार करायची शक्ती, स्वतःचं जीवन स्वतः पाहिजे तसं जगण्याचं साधं सुख, सगळं सगळं एका अविनाशच्या एका नजरेत खाक होतं. '– तर तिच्या या बोलण्यावर राहुलची कॉमेन्ट अशी : ' पण असं खाक होण्यात देखील एक वेगळं सुख आहे '– आणि त्यावर कोयनाची कॉमेन्ट : ' म्हणून तर अविनाश हवा हवासा वाटतो. ' हे संभाषण म्हणजेच ' षड्ज 'चे प्रतिपाद्य आहे. ( पण त्याविषयी नंतर बोलू. )

कोयना व राहुल या उभयतांची ही पहिलीच गाठभेट. पण या पहिल्या भेटीतच कोयना राहुलवर आषक्त होते. आणि ' लेट अस गो टु बेड टुगेदर ',– असे प्रपोज करते.– अर्थात अविनाशच्या गैरहजेरीत. क्षणभर डोळा लागतो का, ते बघायला म्हणून तो आत गेलेला असतो तेवढ्यात. पण अविनाश चाणाक्ष आहे. आणि बाहेर येताक्षणीच त्याला त्या उभयतांमधील परस्पराकर्षणाची जाणीव होते. त्याच्या लेखी राहुल म्हणजे एक कुत्राच आहे. आणि कुत्र्याप्रमाणेच तो त्याला वागवतो. व्हिस्कीचे दोन दोन थेंब टाकत अविनाश पुढे जातो, तसा राहुल कुत्र्याप्रमाणेच ते थेंब चाटत त्याच्या मागोमाग फिरत राहतो. नंतर विषप्रयोगाचा असाच एक खेळ रंगतो. आणि तेवढ्यात अचानक कसलीही पूर्वसूचना न देता कोयनेचा नवरा पणशीकर तेथे टपकतो. आणि रंगात बेरंग करायला तो कारण झाला, म्हणून त्याच्यावर एक खेळातला खटला चालू होतो. त्याच्यावर आरोप ट्रेसपासचा. राहुल आरोपीचा वकील, कोयना साक्षीदार, आणि अविनाश अर्थातच न्यायाधीश. कोयनेची साक्ष आपल्या नवऱ्याच्या विरोधात जाते. तिची साक्ष येणेप्रमाणे :

' मिलॉर्ड, आरोपीला इथं येण्याची काहीच आवश्यकता नव्हती. मी आरोपीला चांगली ओळखते. माझी काळजी वाटली, म्हणून आरोपी इथं आला, असं म्हणणं म्हणजे एक प्रचंड जोक आहे. मी इथं काय काय करते, याची आरोपीला पूर्ण कल्पना आहे. कोणत्या दिवशी मी या फ्लॅटच्या मालकाच्या कुशीत निजले, आणि कोणत्या दिवशी निजले नाही, याची नोंद माझ्या नाही, आरोपीच्याच डायरीत सापडेल... इथून

म. के. स. ठाणे. ग्रंथालय शाखा.
ग्रा. क्र. २२२२५ नों. दि १.६।२१।८०
वि. ........ क्र. ..................

# ‘ षड्ज ’ प्रकाशनाच्या निमित्ताने

अच्युत वझे यांचे ‘ षड्ज ’ हे नाटक जेव्हा प्रथमच रंगमंचावर अवतरले होते, तेव्हाच ते गाजले होते. पण गाजले होते, ते नाटक म्हणून गाजण्यापेक्षा नाटकेतर अशा काही अन्य कारणांसाठी. ते कारण सरकारी नाट्यस्पर्धेतील प्रयोगाच्या कालावधी-बाबतचे होते. नाटकाचा विषय तात्कालपर्यंत मराठी नाटकाला अनोखा असा, नाटक-काराने या अनोख्या विषयाचे घडवलेले नाट्यरूप दर्शन पराकाष्ठेचे मनोवेधक असे, आणि नाटकाचा प्रयोगही मूळ संहितेला न्याय देणारा व अत्यंत देखणा, असे असूनही प्रयोगाचा कालावधी नियमानुसार काही मिनिटे कमी होतो; या क्षुल्लक सबबीवर हे नाटक तेव्हा नाट्यस्पर्धेतूनच बाद केले गेले होते. आणि तेव्हा रसिकांच्या लेखी शासनाशी लढण्यासाठी म्हणून ते एक ‘ कॉज सेलिब्र ’ ठरले होते. आता हा सर्व इतिहास इतिहासजमा झाला आहे. पण तरी सुद्धा आज इतक्या कालावधीनंतर या नाटकाचा प्रयोग ज्यांनी कोणी पाहिला होता, त्यांच्या स्मरणात तो आजतागायत जसा रुतून बसलेला आहे. आणि त्याचे विस्मरण हे वि–स्मरण असे झाले आहे.

‘ षड्ज ’नंतर अच्युत वझे यांनी ‘ चल रे भोपळ्या, टुणुक टुणुक ’ ते ‘ सोफा कम् बेड ’सारखी कित्येक नाटके रचलेली आहेत. आणि ती सर्वच या तरुण कर्तृत्ववान नाटककाराच्या व्यक्तित्वविशेष अशा नाट्यशैलीची आठवण करून देणारी आहेत. पैकी त्यांच्या ‘ सोफा कम् बेड ’चा प्रयोगही ‘ षड्ज ’प्रमाणेच नाटकेतर कारणासाठी पुन्हा एकवार गाजला होता. प्रथम या नाटकाचा प्रयोग सत्यदेव दुबेसारख्या एका प्रतिभाशाली दिग्दर्शकाने घडवला होता. पण त्या प्रयोगात व्यक्त झालेले दिग्दर्शकाचे नाटकाचे इन्टरप्रिटेशन स्वतः नाटककारालाच रुचले नव्हते. पण त्याबाबत वाद घालण्या-ऐवजी नाटककाराने स्वतःच आपले स्वतःचे इन्टरप्रिटेशन प्रयोगरूपात सादर केले होते.

अच्युत वझे यांची नाटके सरळ कधीच नसतात. ती नेहमीच काहीशा तिरकस, उपहासप्रचुर, उपरोधिक अशा वाकड्या शैलीत रचलेली असतात. आणि त्यांचा आणखी एक महत्त्वाचा विशेष म्हणजे ती आजकालच्या काही मराठी प्रायोगिक नाटकांसारखी सर्वस्वी दुर्बोध नसतात. त्यांचे विषयाशय जितके जुने, तितकेच त्यांचे नाट्यरूप नवे असते. आणि ते विचारप्रवर्तक असते. हा नाटककार तरुण असूनही

त्यांच्या तरुण वयाला कदाचित शोभेल असा– उदाहरणार्थ तरुणपणातील नोएल कॉवर्डसारखा– केवळ प्रस्थापिताची खिल्ली उडवण्यात आनंद मानणारा फ्लिपन्ट नाही. तर स्वभावपरत्वे तो गंभीर, सीरीअस आहे. जरी त्याची नाट्यशैली काहीशी उच्छृंखल भासली तरी. जीवनानुभवाचा काही एक विशेष अर्थ शोधण्याच्या नादात तो सदैव गढलेला असतो. ' षड्ज ' नाटकाने त्याने जो षड्ज लावला, तो विस्मयजनक होता.

' षड्ज 'चे नाट्यरूप बाह्यतः फार्सचे आहे. पण त्यातून व्यक्त होणारा ध्वन्यर्थ विलक्षण गंभीर प्रकृतीचा आहे. वर वर पाहिले तर ' षड्ज 'ची कहाणी एका सत्ताधीश अशा कोट्यधीशाची आहे. अविनाश हा कित्येक कारखान्यांचा संचालक–मालक आहे. आणि मध्यरात्र उलटून गेल्यावरही त्याला जे फोन्स सतत येत असतात, ते लाखा-लाखांच्या उलाढालींचे. त्याला जी सत्ता प्राप्त झाली आहे, ती त्याच्या संपत्तिमत्तेच्या परिणामी. त्या अनिर्बंध सत्तेचा उपभोग तो स्वतःच्या वैयक्तिक जीवनातही यथेच्छ घेत असतो. रात्रीचा त्याचा खासगत आयुष्यक्रमही त्याच्या दिवसभराच्या आयुष्यक्रमाशी सुसंगत असाच असतो. त्याला निद्रानाशाचा अपरिहार्य विकार जडलेला आहे. आणि त्याच्या डॉक्टरने प्रिस्क्राइब केलेल्या झोपेच्या गोळ्यांपेक्षा कित्येक अधिक रिचवूनही त्याला झोप कशी ती येत नाही. म्हणून रात्र रात्र स्वेच्छ स्वैराचारात घालवण्याची त्याला सवय जडलेली असते.

कोयना पणशीकर ही त्याची ' तरुण, बांधेसूद, सुंदर ' प्रायव्हेट सेक्रेटरी. वर्षभरापूर्वी कोणा भावड्या पणशीकरशी तिचे लग्न झालेले असते. तरी दहा वर्षांपूर्वी त्याने तिला पैसे मोजून विकत घेतलेली असते. आणि तिच्या लग्नानंतरही तिच्यावरची त्याची सत्ता इतकी अप्रतिहत असते, की तिच्या लग्नाच्या वाढदिवशीसुद्धा मध्यरात्र उलटल्यावर तो तिला सहज फोन करून आपल्या फ्लॅटवर बोलावून घेतो– डिक्टेशन घेण्यासाठी. आणि ती पण आपल्या नवऱ्याची मिठी सोडवून तत्क्षणी त्याच्या सेवेत हजर होते. त्याला ती दररात्र हवीच असते. कारण तिच्याशी शृंगार करताना ' एका भांबावून गेलेल्या, काय घडतंय ह्याची जाणीव नसलेल्या चौदा वर्षांच्या भावड्या पोरीवर आपण बलात्कार करतोय '– असे त्याला अजूनही वाटत असते. त्याच्या आज्ञेबरहुकूम ती जी येते, ती सरळ शय्यागृहातच जाते– अंगावरचे सर्व कपडे उतरवून तत्क्षणी त्याच्या सेवेत हजर होण्यासाठी.

कोयनेवरची त्याची अधिसत्ता इतकी सर्वंकष आहे की तो ' जे काही तिला करायला सांगतो, ते ते आपोआप ' तिच्याकडून ' घडत जाते. ' तो तिला स्वच्छच सांगतो की ' तू कधी रडायचं, कधी हसायचं, ते ठरवण्याचा अधिकार मला आहे. तुला नाही. ' त्याला झोप येत नाही म्हणून त्या उभयतांमधील रिच्युअलसारखे काही काही ठराविक खेळ ते खेळतात. ती त्याला मांडीवर घेऊन थोपटत कसल्या कसल्या राजा–राणी–राजपुत्रांच्या गोष्टी सांगते, लहान पोरांप्रमाणे ती दोघे ' आजीबाई–आजीबाई, ' डॉक्टर–डॉक्टर, भटो–भटो, अटक–मटक, अडगुलं–मडगुलं ' असले काही काही पोरकट खेळ खेळतात.

त्यातील एक म्हणजे जिनच्या बाटल्या सव्वीसाव्या मजल्यावरच्या बाल्कनीतून खालच्या रस्त्यात बेदरकार भिरकावण्याचा. हा खेळ अर्थातच अविनाशचा.

नंतर मग अनपेक्षित टपकतो तो राहुल. तोही कोयनेसारखाच पण त्याचा मेल कम्पॅनिअन. कोयना नसेल, तेव्हा तिच्या गैरहजेरीत त्याची गरज भागवणारा. कोयना असताना तो तेथे का अडमडतो ? तर त्याचे कारण 'इथं येणं माझ्या हातात थोडंच आहे ?'—आल्या आल्या तोसुद्धा 'आता काय खेळू या ? भेंड्या लावू ? गावांच्या ? का गाण्यांच्या ?'– असे विचारतो ! आणि अविनाशने कोयनेला खेळातच एखादे बिझिनेस–लेटर डिक्टेट केले की हा राहुल लगेच कमरेत वाकून तिच्या हाताखालचा टाइपरायटर होतो. कोयना व राहुल यांचे देह वेगळे असले, तरी त्यांची मने एकरूप आहेत. कोयना चक्क असे राहुलला म्हणते : 'अविनाश चक्क मनच गहाण मागतो. काही काहींना कॉम्प्रमाइज जमतो. काहींना जमत नाही. ज्यांना जमत नाही, त्यांचं मन, स्वतः विचार करायची शक्ती, स्वतःचं जीवन स्वतः पाहिजे तसं जगण्याचं साधं सुख, सगळं सगळं एका अविनाशच्या एका नजरेत खाक होतं.'– तर तिच्या या बोलण्यावर राहुलची कॉमेन्ट अशी : 'पण असं खाक होण्यात देखील एक वेगळं सुख आहे'– आणि त्यावर कोयनाची कॉमेन्ट : 'म्हणून तर अविनाश हवा हवासा वाटतो.' हे संभाषण म्हणजेच 'षड्ज'चे प्रतिपाद्य आहे. (पण त्याविषयी नंतर बोलू.)

कोयना व राहुल या उभयतांची ही पहिलीच गाठभेट. पण या पहिल्या भेटीतच कोयना राहुलवर आषक होते. आणि 'लेट अस गो टु बेड टुगेदर',– असे प्रपोज करते.– अर्थात अविनाशच्या गैरहजेरीत. क्षणभर डोळा लागतो का, ते बघायला म्हणून तो आत गेलेला असतो तेवढ्यात. पण अविनाश चाणाक्ष आहे. आणि बाहेर येताक्षणीच त्याला त्या उभयतांमधील परस्पराकर्षणाची जाणीव होते. त्याच्या लेखी राहुल म्हणजे एक कुत्राच आहे. आणि कुत्र्याप्रमाणेच तो त्याला वागवतो. व्हिस्कीचे दोन दोन थेंब टाकत अविनाश पुढे जातो, तसा राहुल कुत्र्याप्रमाणेच ते थेंब चाटत त्याच्या मागोमाग फिरत राहतो. नंतर विषप्रयोगाचा असाच एक खेळ रंगतो. आणि तेवढ्यात अचानक कसलीही पूर्वसूचना न देता कोयनेचा नवरा पणशीकर तेथे टपकतो. आणि रंगात बेरंग करायला तो कारण झाला, म्हणून त्याच्यावर एक खेळातला खटला चालू होतो. त्याच्यावर आरोप ट्रेसपासचा. राहुल आरोपीचा वकील, कोयना साक्षीदार, आणि अविनाश अर्थातच न्यायाधीश. कोयनेची साक्ष आपल्या नवऱ्याच्या विरोधात जाते. तिची साक्ष येणेप्रमाणे :

'मिलॉर्ड, आरोपीला इथं येण्याची काहीच आवश्यकता नव्हती. मी आरोपीला चांगली ओळखते. माझी काळजी वाटली, म्हणून आरोपी इथं आला, असं म्हणणं म्हणजे एक प्रचंड जोक आहे. मी इथं काय काय करते, याची आरोपीला पूर्ण कल्पना आहे. कोणत्या दिवशी मी या फ्लॅटच्या मालकाच्या कुशीत निजले, आणि कोणत्या दिवशी निजले नाही, याची नोंद माझ्या नाही, आरोपीच्याच डायरीत सापडेल... इथून

घरी गेल्यावर माझा पहिला अर्धा तास नेहमीच आरोपीच्या प्रश्नांना उत्तरं देण्यात जातो. आज आरोपी इथं आला, तो मी इथं काय करते हे माहीत असूनही, स्वतःच्या डोळ्यांनी बघण्याचं कुतूहल भागवण्यासाठी आला. या फ्लॅटमधे एकदा प्रवेश केला, की काय किंमत द्यावी लागते; त्याची आरोपीला कल्पना नाही. तरी पण मिलॉर्ड, माझी अशी विनंती आहे, की आरोपीला कोणतीही सहानुभूती न दाखवता कठोर शिक्षा व्हावी.'

अविनाश शिक्षा फर्मावतो ती या खेळातील मॉक्-ट्रायलला शोभेल अशीच. दहा उठाबशा काढण्याची,–' मी मूर्ख आहे ' असे म्हणत या खोलीत तीन प्रदक्षिणा मारण्याची. आणि आमच्या सगळ्यांच्या देखत आताच्या आता आपल्या बायकोशी शृंगार करण्याची. – हा शृंगार म्हणजे अर्थातच नवऱ्याला ओरबाडून त्याचा चेहरा रक्तबंबाळ करण्याचा, हे कोयना आपसुक ओळखते. कारण प्रत्येक बाबतीत आपल्या धन्याचे मनोगत काय, ते बरोबर ओळखून तदनुसार सतत वागण्याची सवय तिला आरंभापासूनच जडलेली असते. तदनंतर कोयना व राहुल जनावरासारखे चार पायांवर उभे असल्याची पोज घेतात, आणि अविनाश ' त्यांच्या गळयात असलेले अदृश्य दोरखंड लगामासारखे पकडतो. '– मग अविनाश माकडवाल्याच्या यत्किंचित इशाऱ्यासरशी ती दोन माकडे नाचत राहतात.

पणशीकरला हे सर्व नवेच असते. आणि त्याचे कोर्ट मार्शल संपेपर्यंत त्याची एकूण अवस्था ' आश्चर्यवत् पश्यति ' अशी भयग्रस्तच झालेली असते. प्रथम कुतूहलाने, नंतर भयाने आणि तदनंतर काहीशा निर्धाराने, तो ज्यांचा साक्षी असतो, त्या सर्व घटनांकडे बघत असतो. निर्धार तर आवश्यकच होता. त्याच्यासमोर दोन मार्ग होते. एक म्हणजे त्याची बायको झाली, त्याप्रमाणे अविनाशच्या हातातील कळसूत्री बाहुले होणे. अन्यथा त्याच्या विरोधात निधडेपणाने जमिनीत घट्ट पाय रोवून ठाकणे. अविनाशने फर्मावलेल्या शिक्षा तो निमूटपणाने भोगतो, तोपर्यंत तोसुद्धा धनी–गुलामाच्या या खेळात अनिच्छ अगतिक वृत्तीने सहभागी झालेला असतो. पण शेवटची तिसरी शिक्षा भोगतेवेळी मात्र एकाएकी त्याचे मन बंड करून उठते. आणि ' नाही, मी बळी होणार नाही, '-- अशा निर्धाराने तो अविनाशला आव्हानपूर्वक सामोरा जातो.

प्रस्तुत नाटकाचा शेवट अगदी अनपेक्षित असा आहे. आणि त्या शेवटातच नाटकाचे खरे मर्म अनुस्यूत आहे. कोयना एकदा म्हणालीच होती की ' अविनाश चक्क मनच गहाण मागतो. पण अविनाशच्या एका नजरेत खाक न होणाऱ्या दुर्मिळां-पैकी एक म्हणजे हा पणशीकर आहे. अविनाश त्याला विचारतो : ' फार झालं काय ! '– त्यावर पणशीकरचे उत्तर : ' सहनशक्तीच्या बाहेर.'– तेव्हा अविनाश कोयना–राहुलकडे अंगुलिनिर्देश करून म्हणतो : ' यांना नाही वाटत तसं.'– यावर पणशीकरची प्रतिक्रिया : ' त्यांची सहनशक्ती दांडगी आहे.'– अभिप्राय असा की ' मी हे कदापि सहन करणार नाही. ' तत्क्षणी अविनाश म्हणतो : ' पणशीकर, वेळ आली. - आणि पणशीकर त्याला नेमकी दाद देत म्हणतो : ' तुमचा अंदाज बरोबर आहे. '

मग मात्र अविनाशचे सर्व अवसान एकाएकी गळून पडते. कारण तोही एका पोजचा बळी असतोच. तो एकदम ' काकुळतीस येऊन म्हणतो : ' पणशीकर, आय बेग ऑफ यू, माझी सुटका करा. ऋणी होईन मी तुमचा. मला फार कंटाळा आलाय... फार कंटाळा...मुक्ती हवीय. देणार ? '– आणि एका क्षणाचाही विलंब न लावता पणशीकर अगदी शांतपणाने आश्वासनपूर्वक त्याला सांगतो : ' तुम्हाला मुक्ती मिळेल.'– आणि अविनाशला आश्वासनानुसार मुक्ती मिळते.– तो बाल्कनीतून खाली कोसळतो. पण अखेरच्या मुक्तिक्षणापर्यंत अविनाशची कोयना-राहुलवरची सत्ता अबाधित असते.

–पण मग मात्र अगदी अचानक एकाएकी, अनपेक्षित सारेच चित्र बदलते. सदैव सत्तेच्या हुकुमतीत वागणाऱ्या कोयना–राहुल सारख्यांना गुलामगिरीत राबण्याची इतकी सवय जडलेली असते की एक धनी गेला, तर त्याच्याचसारखा दुसरा धनी शोधण्या-शिवाय त्यांना गत्यंतर नसते. आणि असा दुसरा धनी त्यांना पणशीकरच्या रूपात सापडतो, तेव्हाच ते स्वस्थचित्त होतात. दि शो मस्ट गो ऑन. एक रिंगमास्टर गेला, तर त्याची जागा दुसरा रिंगमास्टर घेतो. सर्कस चालू राहते. प्राण्यांना धाकात ठेवणारा रिंगमास्टर एक नाही तर दुसरा मौजूद असेपर्यंत सर्कस चालू राहणारच असते. अविनाश जातो, तत्क्षणी अविनाशच्याच रूपात पणशीकर प्रकट होतो. कोयना-राहुल पणशीकरच्या प्रत्येक आज्ञेची वाटच बघत असतात. आज्ञापक धनी प्राप्त झाल्याशिवाय त्यांचा आयुष्यक्रम सार्थकी लागत नाही.

एका क्षणापूर्वी कोयना–राहुल अविनाशच्या इशाऱ्यावर नाचत होते. आता ते पणशीकरच्या इशाऱ्यावर नाचतात. हे सत्तान्तर निमिषार्धात घडून येते. ते केवळ हुकुमाचे ताबेदार. या नव्या सत्ताधीशाला पणशीकर म्हणून त्यांनी हाकारताच पणशी-कर त्यांच्यावर खेकसून म्हणतो : ' कोण पणशीकर ? आजपासून अविनाश म्हणायचं मला. '– मग राहुल सवयीप्रमाणे पुन्हा एकदा कुत्रा होतो. आणि पणशीकरच्या मागून व्हिस्कीचे थेंब चाटत सरपटू लागतो.

सत्तान्तराच्या परिणामी कोयना एक क्षणभर ' न राहवून पणशीकरच्या कुशीत शिरते व रडू लागते. ' पणशीकर प्रथम ' तिच्या केसातून प्रेमाने शांतपणे हात फिरवतो. ' पण मग अचानक ' तो तिचे केस खेचतो. ' व अविनाशच्याच आविर्भावात तिला दरडावतो : ' रडू नकोस कोयना. तू कधी रडायचं, कधी हसायचं, हे ठरवण्याचा अधिकार या अविनाशला आहे. तुला नाही.'– आणि त्याच्या तोंडचे शेवटचे वाक्य असे आहे : ' मी जरा आत जाऊन झोप लागते का, प्रयत्न करून पाहतो...माझ्या गोळ्या कुठं आहेत ? '- म्हणजे असे की पणशीकर ज्या क्षणी अविनाश होतो, त्याच क्षणी अविनाशची अस्वस्थता आणि त्याची निद्रानाशाची प्रवृत्तीही त्याला आपली म्हणून दत्तक घ्यावी लागते !

–तर असे हे नाटक. धनी आणि गुलाम यांच्यातील परस्परसंबंध वेध घेऊन शोधणारे. खरे तर येथवर नाटकाचे कथानक (कधी सांगू नये ते अगोदर ) सांगितले,

त्याचे कारण एकच. या कथानकाचा बोध झाल्याशिवाय नाटकाचे जे प्रतिपाद्य त्याचाही बोध अबोधच राहता. प्रस्तुत नाटकात खरोखर चारच व्यक्ती आहेत. अविनाश, कोयना, राहुल व पणशीकर. त्यांचे परस्पर संबंध निर्देशित व स्पष्ट करणे हे आरंभी आवश्यकच होते. कारण ते समजल्याशिवाय नाटकाच्या अंतिम प्रतिपाद्याचा विचार करताच आला नसता. आणि नाटकाच्या समजुतीच्या दृष्टीने हा प्रतिपाद्य विचार सर्वाधिक महत्त्वाचा आहे.

'षड्ज'ची एकूण गोष्ट, तसाच विचार केला तर, काहीशी चाइल्डिश, काहीशी फार्सिकल दिसते. पण जरा खोलवर विचार केला, तर ती तशी वाटत नाही. दिसणे आणि वाटणे यातील हा फरक आहे. दिसते ते बहिरंग, आणि वाटण्यात प्रत्ययास येते ते अंतरंग, 'षड्ज'च्या खेळात तसे अनेक लहान मोठे खेळ गुंतवलेले आहेत. पण या सर्व खेळांचा मिळून जो एक मोठा खेळ होतो, त्याचा संबंध व्यापक लोकजीवनाशी आहे. लोकांचे जीवन विनाव्यत्यय, सुखरूप, सुरळीत चालावे, यासाठी लोकांना खरे तर त्यांच्यातीलच एक जबरदस्त शास्ता हवा असतो. आपल्या 'महाभारता'त पहिला राजा कसा जन्मास आला, त्याबद्दलची एक मोठी मार्मिक कथा आहे. भारतीय युद्धाच्या परिणामी वढून आलेला सर्वंकष सर्वनाश रौद्रभीषण रूपात समोर ठाकल्यावर युद्धजेता युधिष्ठिर शरपंजरी शांत पहुडलेल्या भीष्माचार्यांकडे गेला आणि सांत्वनार्थ त्याने आपली मनोव्यथा आचार्यांना बोलून दाखवली. त्याच्या मनोगतात त्याला निरुत्तर करणारे असे अनेक प्रश्न दाटले होते.– राजा कोण असतो ? राजा कशासाठी असतो ? राजा कसा जन्माला आला ?- राजर्षी भीष्म सर्वज्ञच होते. प्रश्नकर्त्याची जिज्ञासा त्यांनी जाणून घेतली, आणि जे उत्तर दिले; ते आजही महत्त्वाचे वाटेल, असे आहे. पितामह म्हणाले :

"हे धर्मा, आधी राजा नव्हता की प्रजा नव्हती. सर्व लोक परस्परांशी समजुतीने, प्रेमाने वागत होते पण मग एक दिवस संपत्तीचा जन्म झाला. आणि पाठोपाठ कली उदयाला आला. स्वार्थासाठी, धनासाठी माणसात कलह माजला. आणि सार्वत्रिक कलहानंतर अराजक माजले. यज्ञयाग बंद पडले. ज्ञानार्जन थांबले. शांतता नष्ट झाली. स्वतःच निर्माण केलेल्या अराजकाला लोक भ्याले. ते ब्रह्मदेवाकडे गेले. त्याची त्यांनी करुणा भाकली : –' हे सृष्टिकर्त्या, आम्हाला कोणी शास्ता दे. राजा दे. '– ब्रह्मदेवाने मनूला सांगितले : – ' मनू, तू यांचा राजा हो. '– मनू म्हणाला : ' कसा होऊ ? राजा झालो, तर या लोकांची पापं माझ्या माथी घ्यावी लागतील. '– लोक म्हणाले, – ' घे. बदल्यात तुला आम्ही आमच्या उत्पन्नाचा दहावा भाग करभार म्हणून देऊ. आमच्या उपवर कन्या आधी तुझ्या भोगार्थ पण अर्पू. तू आमचा राजा हो. '... आणि मनू राजा झाला."

उपर्युक्त कथेचे तात्पर्य उघड आहे. लोकांना आपला शास्ता म्हणून कोणी राजा हवा असतो. राजाची मागणी ही प्रजेचीच मागणी असते. या नाटकात कोयना एका

ठिकाणी म्हणते : ' खरं म्हणजे सगळयांना कुठे ना कुठे तरी अविनाश हा भेटतोच. ' कारण अविनाश हा शास्ता असतो. आणि त्याच्या आज्ञेत राबल्याशिवाय गत्यंतर नाही, हे लोकांना पटलेले असते. लोक असहाय्य असतात. आणि अराजकाला निमंत्रण देण्यापेक्षा सर्वंकष शास्ताही परवडेल, अशीच त्यांची धारणा असते. त्याच्या आज्ञेत राबण्यात सुख आहे, हे त्यांना मनोमन पटलेले असते. प्रजेला राजा हवा असतो. आणि म्हणून राजाचा कारभार असह्य झाला, तरी शेवटी त्या कारभारासाठीच लोक राजाविषयी कृतज्ञ असतात. लोकांनाच राजा हवा असतो, म्हणून तो असतो. खुद्द राजाही अंतर्यामी समाधानी असतो, असे नाही. त्यालाही लोकराज्याच्या जबाबदारीचे जोखड असह्य झालेले असते. ' मुकुटधारी मस्तक अस्वस्थ असते, '– असे जे शेक्स-पीअरने म्हटले आहे, तेही खरेंच आहे.

सत्ताधीश राजाची सत्ता सर्वंकष असली, तरी तो स्वतः कायम बेचैन असतो. तोही मुमुर्षु असतो. मरणाने त्याला मुक्ती दिली, म्हणून त्याच्यापुरते सारे संपले, तरी तो तसा अविनाश असतो. राजा मरतो. तरीही राजा अमर असतो. मृत राजाची जागा दुसरा राजा घेतो. प्रस्तुत नाटकात अविनाशची जागा पणशीकर घेतो त्याप्रमाणे. पण पणशीकरला सुद्धा अविनाश म्हणून मान्यता हवीच असते. म्हणून तर अविनाश म्हणूनच कोयना–राहुलने आपल्याला स्वीकारावे, असा त्याचा आग्रह असतो. येथे कोयना काय किंवा राहुल काय, दोघेही लोकमानसाचे प्रतिनिधी की ज्यांना अविनाश-विना जगण्याची कल्पनाही असह्य वाटते. तात्पर्य : ' षड्ज ' हे एक रूपक आहे. राजकारणाच्या संबंधातील मनोरम असे एक रूपक.– ज्याचा राजकीय गर्भितार्थ गंभीर आहे, असे राजकीय रूपक.

–पण शेवटी नाटक हाही एक खेळच असतो. ' दि प्ले इज दि थिंग ! '– जे शेक्स-पीअरने म्हटले आहे, ते उगाच नव्हे. आता खेळ जर मनोरंजक नसेल, तर त्यात कोण गुंगून पडणार आहे ? कोण सहभागी होणार आहे ? म्हणून नाटक म्हणजे रंजनार्थ खेळ ही भूमिका स्वीकारणे प्राप्तच असते. आपला नाटकी खेळ रंजक करण्या-साठी नाटककार अनेक क्लृप्त्या योजतो. ' षड्ज 'सारखे एखादे हलके फुलके आणि रंजक असे कथानक तो घेतो. हेतू हा की, प्रेक्षकांनी त्या कथानकात रस घ्यावा. पण ' आन्तरः कोऽपि हेतू ' वेगळाच असतो. तो अन्तर्गत हेतू कोणाच्या ध्यानी आला, तर भले. पण तसे घडले नाही, तरी त्याच्या परिणामी फारसे बिघडत नाही. कारण जे घडले, ते स्वतःच पुरेसे रंजक असले; म्हणजे नाटककाराचे काम भागते. कारण जो शोधील, त्याला ध्वन्यर्थ प्राप्त झाला; तरी जो शोधणार नाही, त्याच्यासाठी रंजक असा खेळ शिल्लक उरतोच. शेवटी खेळ म्हणूनही ' षड्ज ' पराकाष्ठेचे रंजक आहेच.

' षड्ज ' ही त्या नावाच्या नाटकाच्या निर्मितीच्या काळात नाटककाराने म्हटलेली नांदी होती. संगीताच्या परिभाषेत षड्ज हा एक प्राथमिक स्वरविशेष आहे. तो परिश्रमपूर्वक साध्य करून लावावा लागतो. ' षड्ज ' हे अच्युत वझे यांचे प्रारंभिक

नाटक आहे. त्याचा पहिला प्रयोग पाहिला, तेव्हाच ज्ञातास्वाद रसिकांनी म्हटले होते की, ' वा ! षड्ज काय छान लागला आहे. '— तदनंतरच्या श्रुतिसुभग गानविस्ताराचे हे प्रास्ताविक शुभचिन्ह रसिकांच्या लेखी मोठे आश्वासक होते.

मुंबई, २७–२–८७

– माधव मनोहर

# पूर्वार्ध

[ मंद प्रकाश. गॅलरीत अविनाश उभा आहे- पाठमोरा. सिल्क गाऊनमध्ये. पाईप ओढत. धुराची वलये वर जाताना दिसतात. दुरून बाराचे टोले ऐकू येतात. अविनाश समोर फिरतो. मधल्या टेबलाकडे जातो. बाटलीतून तीन पांढऱ्या गोळ्या काढतो. ग्लासात पाणी ओततो. गोळी तोंडात टाकणार इतक्यात टेलिफोन वाजतो. अविनाश स्तब्ध. थोड्या वेळाने सावकाश एका पाठोपाठ एक गोळी घेतो. फोन वाजतच आहे. शांतपणे फोनच्या टेबलाशी जातो- थोडा वेळ फोन उचलावा की नाही ह्याचा विचार करतो. शेवटी उचलतो. ]

अविनाश : अविनाश हियर (विसावा) नमस्कार (कपाळावर आठ्या) चंदूशेठ, आता वाजले किती ! दहा-अकरा, नाही, बारा वाजून पंचेचाळीस सेकंद. ही काय बिझनेसच्या गोष्टी करायची वेळ आहे ! ( विसावा ) नाही, नाही. चंदूशेठ गोष्ट तीस हजाराची असो किंवा तीस लाखाची- उद्या सकाळी ऑफिसमध्ये फोन करा ( विसावा ) नाही, तुम्ही येऊ नका- त्याची गरज नाही- फक्त फोन करा- माझ्या सेक्रेटरीला. गुड नाईट.

(फोन ठेवतो. केसातून हात फिरवतो. ड्रॉवरमधून पत्त्याचा जोड काढतो. मधल्या टेबलावर जातो. टेबलावरची बाटली पाहून भडकतो. टेबल क्लॉथ खेचतो. बाटली, ग्लास, पाण्याचा जग खाली पडतो. तिकडे दुर्लक्ष. ध्यान देऊन पेशन्सचा डाव मांडू लागतो. थोड्या वेळाने परत फोन वाजतो. काही वेळ दुर्लक्ष. फोन वाजत राहतो. मग वैतागून उठतो व फोन उचलतो.)

डोण्ट यू डेअर डिस्टर्ब मी एवर अगेन ( हसतो ) कोण डॉक्टर ! आय एम ऑफुली सॉरी. आय थॉट इट वॉज समवन एल्स. ( विसावा ) नाही डॉक्टर, झोपेचा अजून पत्ता नाही. आताच तीन गोळ्या घेतल्या आहेत. ( हसून ) डॉक्टर, कशाला उगाच चेष्टा करता ! काही उपयोग होत नाही कशाचा. काल पाच गोळ्या घेतल्या तेव्हा अर्धा तास झोप आली. (खालच्या पट्टीत ) झोप कसली- अर्धवट गुंगी होती झालं- डोळे उघडे ठेवून गुंगी घ्यायच्याऐवजी डोळे मिटून- बसं एवढंच ( विसावा ) नाही

डॉक्टर, कॅपनियन कशाला ? माझ्याबरोबर त्याला देखील जागत राहायचं. (हसून) हो, पैसे देतो– पण म्हणून काय उगाच त्रास द्यायचा ? नो डॉक्टर, आय वोण्ट कॉल हिम टुनाइट. नाही, जास्ती घेणार नाही. थँक्स फॉर कॉलिंग डॉक्टर अॅण्ड गुड नाईट.

( फोन ठेवतो, रिसीव्हरवर हात ठेवून, डोके खाली घालून विचार करतो. एकदम आठवून वर बघतो. डोळ्यांत चमक. क्षणभर थांबून भरभर नंबर फिरवतो. फोन उचलून आरामखुर्चीजवळ नेतो. बसतो. )

हॅलो, कॅन आय स्पीक टू कोयना पणशीकर ? मी. मी अविनाश बोलतोय. ( विसावा ) हॅलो, कोयना, अविनाश हियर. फाईन, थँक्यू. कोयना, जरा महत्त्वाचं काम निघालं आहे. हो अर्जंट. (हसून) हो, हो, इमिजिएट. जरा डिक्टेशन घ्यायचं आहे ( खुशीत ) आह. ग्रेट. आयल बी वेटिंग फॉर यू.

(फोन ठेवतो. मधल्या टेबलाशी जातो. पत्ते पाहतो. भडकतो. एका झटक्यात सगळे पत्ते उडवून टाकतो. टेबलावर बसतो. गाऊनच्या खिशातून विझलेला पाईप काढतो. पेटवतो. तीन चार झुरके घेतो. स्वतःशीच खिन्नपणे हसतो व काचेच्या कपाटाजवळ जातो. व्हिस्कीची बाटली व ग्लास काढतो. आराम-खुर्चीवर बसतो. ओतू लागतो. फोन वाजतो. ओततो. ग्लास संपवतो. मग. फोन उचलतो. )

अविनाश हियर. आय अॅम सॉरी, नॉट दिस टाईम ऑफ द नाईट.

( फोन ठेवतो. दुसरा ग्लास ओततो. फोन वाजू लागतो. ग्लास संपवतो. फोन उचलतो– शांतपणे )

कोण पाहिजे आपल्याला ? अविनाश ? अविनाशसाहेब झोपले आहेत. ( विसावा ) चेष्टा नाही करत– खरंच झोपले आहेत. निद्रानाश ? कोणाला झालाय निद्रानाश ? आमच्या साहेबांना नाही झाला निद्रानाश.

(फोन आपटतो. अस्वस्थ. उठतो. अस्वस्थपणे फेऱ्या घालतो. गॅलरीत जातो. परत येतो. मधल्या टेबलाकडे जातो. भडकून टेबल लाथाडतो. फोन वाजू लागतो. दुर्लक्ष करतो. गॅलरीत जातो. शेवटी कंटाळून, चिडून येतो व उभ्यानेच फोन उचलतो. )

कोण पाहिजे तुम्हाला ? बर्वे ? कोण बर्वे ? मी अविनाश बोलतोय. नाही इथे मधुकरराव बर्वे वगैरे कोणी राहात नाही– मला वाटतं आपण चुकीचा नंबर फिर...अहो, असं काय करता म्हणजे ? मी खरंच– मला एक आनंदाची बातमी ऐकवायचीय म्हणता ? ऐकवा (बसतो) हो का ? आपल्या बबडीचं लग्न ठरलं का ? वा, वा. पण आपण कोण ? ओ हो, दत्तोपंत– म्हणजे आपली बबडी होय ? वा, वा. असं का ? कोण तो भाग्यशाली

मुलगा ? कोण जोशी इंजिनियर ? आयसी, त्यांचा मुलगा काय ? वा. हो ना. आपली बबडी एवढीशी होती आता केवढी मोठी झाली. वा, वा. लाख बोललात, आपल्याला अजून बबडी ती बबडीच वाटते, काय ? बरं, बरं, जरूर, अगदी जरूर, अहो, आपल्या बबडीच्या साखरपुड्याला नाही यायचं असं कसं होईल ? अवश्य, माझ्यातर्फे बबडीचा एक गालगुच्चा घ्यायला विसरू नका हं. (फोन ठेवतो. स्वतःशीच हसतो) आपल्या बबडीसाठी.

(एक पेग ग्लासात ओततो. संपवतो. फोनकडे पाहतो. रिसीव्हर काढून ठेवतो. रेकॉर्ड प्लेयर लावतो. चॅकॉस्किचे संगीत ऐकू येते. सोफ्यावर पालथा पडतो. थोडा वेळ तसाच. मग मान वर करून फोनकडे पाहतो. उठतो. प्लेअर बंद करतो. रिसीव्हर परत ठेवतो व फोनची वाट बघत राहतो. दारावरची बेल वाजते. चटकन फोन उचलतो. फोन नसून कॉलबेल आहे हे लक्षात येते. हसतो. फोन ठेवतो. परत बेल वाजते. आणखी एक पेग ओततो व संपवतो. परत बेल. दार उघडतो. दारात कोयना पणशीकर. तरुण. बांधेसूद. सुंदर. तीक्ष्ण डोळे. ती आत येते.)

अविनाश : कमिन, कमिन, (ती आत आलेली आहे हे लक्षात येत) तुला कमिन म्हणायची आवश्यकता नाही हेच विसरलो. (हसतो. दार लोटतो. पुढे येतो.) कोयना, आय लाइक यू अॅज यू आर.

(दाराकडे बघतो. परत जातो व बोल्ट लावतो. कोयना ते बघते. खिन्नपणे हसते. पर्स सोफ्यावर टाकते व आत जाऊ लागते.) कोयना, निघालीस कुठं तू ?

कोयना : आत.

अविनाश : आत ? आत कशाला ?

कोयना : (मागे वळून. अविनाश जवळ जाऊन) मी आत कशाला जाते हे खरंच माहीत नाही तुला ?

अविनाश : (साळसूद) नाही.

कोयना : (वेडावून) मग ओळख पाहू. तुला तीन गेसेस देते मी.

अविनाश : (खूष) आहा, तीन गेसेस (विचार करून) अं... पाणी प्यायला ?

कोयना : चूक

अविनाश : अं... कोकाकोला प्यायला.

कोयना : चूक

अविनाश : अं... मला घाबरून ?

कोयना : नाही. (आत जाऊ लागते.)

अविनाश : होल्डिट, कोयना– तू तरी सांग.

कोयना : माझ्याच तोंडून वदवून घ्यायचंय ना तुला ? (आवाज जरा मोठा करून)

हो, हो, खरं आहे, मी आत चालले आहे ती कपडे काढण्यासाठी– कपड्यांचा उगीच त्रास नको– दीड वाजेपर्यंत परत जायचंय मला–
(काही वेळ स्तब्धता)

अविनाश : (आवाज बदलून) कोयना... किती वर्षं झाली ग आपली ओळख होऊन ?

कोयना : लक्षात नाही माझ्या– सर्विसला लागूनच सात–आठ वर्षं झाली.

अविनाश : आणि त्याच्या आधी दोन-तीन वर्षं– छे, छे, इटस् टू मच– आपण फार चांगले ओळखायला लागलोय एकमेकांना– जरुरीपेक्षा जास्त चांगलं– नाही कोयना ?

कोयना : मला काहीच विचारू नकोस– ह्या घरात पाऊल टाकलं की मला काहीच सुचेनासं होतं– डोकं सुन्न होऊन जातं– स्वतःचा स्वतःला काही विचारच करता येत नाही– तू जे जे काही करायला सांगतोस ते ते आपोआप घडत जातं– कळत सुद्धा नाही.

अविनाश : (मिष्कील) फरगेट इट, कोयना. इकडे ये (तिला खेचत सोफ्याकडे नेत) मी तुला एक जोक सांगतो– सांगू ?

कोयना : (उत्साहाने) ओह येस, खरंच सांग–

अविनाश : एकदा काय झालं, हा आपला मिल्खासिंग जरा आराम करत बसला होता–

कोयना : इश्श, ऐकलाय मी–

अविनाश : पण पुढे तर ऐक– तिकडनं एक इंग्लिशमन आला आणि त्याने मिल्खासिंगला विचारलं– आर यू रिलॅक्सिंग ? मिल्खासिंग म्हणाला– यॅस. (थोडा वेळ स्तब्धता. मग कोयना खिदळून हसते)

कोयना : (लाडिक) अविनाश. (अविनाश उठतो. पेग भरतो. संपवतो.)

अविनाश : (कोयनाकडे अचानक लक्ष गेल्यासारखे करून) मी... मी... तुम्हाला कुठंतरी पाहिल्यासारखं वाटतंय–
(कोयना चकित. थोडा वेळ स्तब्धता.)

कोयना : (डोळ्यांत चमक) फॅन्टास्टिक. मी पण मगाचपासून तोच विचार करतेय– की तुम्हाला कुठं पाहिलं असावं ?

अविनाश : (आठवून) तुम्ही काल ते बाहुल्यांचं एक्झिबिशन पाहायला आला होता ?

कोयना : (सहज) नाही–

अविनाश : (विचार करून) आह, तुम्ही काल बुलक-कार्टमध्ये आला होता रात्री ?

कोयना : छे, मुळीच नाही–

अविनाश : मग... मग... तुम्हाला लोकल ट्रेनमध्येच पाहिलं असेल–

कोयना : नाही, मी ट्रेननं कधीच जात नाही– बसनंच येते.

अविनाश : असं ? मग मला वाटतं तुमच्याचसारख्या दिसणाऱ्या आणखी कोणाला पाहिलं असेन मी–

क्र. २२२२५ १०/१/८५
नाटक


कोयना : हं. बहुतेक तसंच असावं.

अविनाश : एनी वे, आता आपली ओळख झालीच आहे– मी अविनाश– तीनचार फॅक्टरीज चालवतो–

कोयना : ग्लॅड टू सी यू– मी कोयना पणशीकर.

अविनाश : वा, कोयना. काय सुंदर नाव आहे.

कोयना : ( लाजून ) माझे वडील पाटबंधारे खात्यात काम करत होते.

अविनाश : ( आठवत ) आय सी– पाटबंधारे खात्यातले पणशीकर म्हणजे म्हणजे ते डिविजनल सुपरिंटेंडेंट होते ना ..

कोयना : कोण ? माझे वडील ? ते हेडक्लार्क होते...

अविनाश : ( आठवल्यासारखे करून ) यॅस, हेडक्लार्क पणशीकर– अफ कोर्स, मी त्यांना ओळ...

कोयना : पणशीकर कोण ? पणशीकर हे तर माझ्या सासरचं नाव आहे–( स्तब्धता )

अविनाश : म्ह - म्हणजे तुमचं लग्न झालंय ?

कोयना : ( लाजून ) हो.

अविनाश : ( गंभीर होऊन, पाठमोरा होऊन ) कोयना– आपण प्रथम भेटलो त्यावेळी तुझं लग्न झालेलं नव्हतं.

कोयना : ( गंभीर ) एक माहितीय तुला अविनाश ? आज आमच्या लग्नाचा पहिला वाढदिवस आहे–

अविनाश : ( आश्चर्याने ) आणि तरी पण तू ..

कोयना : ( हसून ) काय करणार ? ड्यूटी. तुझी पर्सनल सेक्रेटरी आहे ना मी.

अविनाश : डोण्ट टॉक शिट–

कोयना : ( गंभीर ) खरं कारण म्हणजे मला... मलाच यावंसं वाटलं.

अविनाश : ( अस्वस्थ ) माझा फोन पणशीकरांनीच उचलला.

कोयना : सवय झालीय त्यांना.

अविनाश : पण तेही काही म्हणाले नाहीत लग्नाचा पहिला वाढदिवस वगैरे.

कोयना : त्यांच्यातरी लक्षात कुठंय ?

अविनाश : आणि तू त्यांना आठवण करून दिली नाहीस ?

कोयना : मला वाटलं त्यांच्याच लक्षात येईल. पण छे– नाहीच. शेवटी कंटाळून मीच सांगणार होते. पण तितक्यात–

अविनाश : फोन वाजला. ( फोन वाजतो )
( अविनाश जांभई देत, चिडत फोनकडे बघतो. )

अविनाश : कोण साला ह्या वेळेला फोन करतो.

कोयना : अहो, बघत काय बसला उचला तरी.

अविनाश : तुम्हीच उचला. ह्या वेळेला फोन करणारी व्यक्ती एकच.

कोयना : कुणाबद्दल म्हणता तुम्ही ?

अविनाश : थांब, सांगतोच तुला (फोन उचलतो) बोला, मी पणशीकर बोलतोय- कोयना पणशीकर पाहिजेत ? आहेत हं, आपण कोण ? आय सी, जरा थांबा हं. फोनवर हात ठेवून ) घ्या, तुमच्यासाठीच आहे- आणि त्याचाच आहे. (फोन कोयनाला देतो.)

कोयना : हॅलो, हॅलो अविनाश, हाव आर यू ? फार अर्जंट आहे काय ? अगदी इमिजिएट ? डिक्टेशन ? मी... मी .. ( ठरवून ) ओ. के. मी निघतेच आहे, लागलीच. (फोन ठेवते.)

अविनाश : मी पोचवायला येऊ का ?

कोयना : जरूर नाही. दोन मिनिटांचं तर अंतर-

अविनाश : जशी तुमची मर्जी. पण जरा लवकर परत यावं- जास्तीत जास्त दीड वाजे-पर्यंत, काय ?

कोयना : दीड वाजेपर्यंत येईन मी.

(दरवाज्याने बाहेर जाते. अविनाश एक पेग घेतो. दारावरची बेल. अविनाश दार उघडतो. कोयना प्रवेश करते. अविनाश दार लावतो.)

कोयना : (एकदम, ओक्साबोक्सी रडत) अविनाश. ( अविनाशच्या गळ्यात जाऊन पडते व रडत राहते, दोघांवर लाल स्पॉट. अविनाशच्या चेहऱ्यावर भयंकर भाव).

अविनाश : ( थोड्या वेळाने कोयनाचा गळा पकडून, ओरडून) रडू नकोस, कोयना- सैतानाला मन विकलंयस तू- तू कधी रडायचं, कधी हसायचं, हे ठरवण्याचा अधिकार मला आहे, तुला नाही. ( ढकलून देऊन, शांतपणे, संपूर्ण प्रकाश.) जा, थोडी जिन अॅन्ड लाईम घे. बरं वाटेल. (कोयना स्वतःला सावरते, डोळे पुसते. ) गो अहेड- हेल्प युवरसेल्फ- नेहमीच्याच जागेवर आहे ( यांत्रिकपणे कोयना काचेच्या कपाटातून जिन आणि कॉर्डियलच्या बाटल्या काढते. ग्लासात ओतते. ग्लास घेऊन सोफ्यावर बसते. अविनाश स्वतः एक पेग घेतो.)

अविनाश : ( थोड्या वेळाने, कोयनाजवळ जाऊन, हळुवारपणे) कोयना...कोयना रागावली नाहीस ना माझ्यावर ? कोयना, फार विचित्र आहे ग मी, फार विचित्र (कोयनाच्या मांडीवर हात फिरवू लागतो.) कोयना, माझं एक ऐकशील ? अगदी मनापासून सांगतोय मी कोयना- लिसन कोयना, प्लीज, मला...मला...एवढंच सांगायचं की (एकदम उठून-ओरडून) कोयना, ह्यापुढे परत कधी इथं येऊ नकोस- (कोयना स्तब्ध) कोयना, तुला सांगतोय मी हे- का येतेस तू इथं, का ? तुला पैशाची काही आवश्यकता नाही, नोकरीची गरज नाही, तुझा नवरा त्या दोन हॉटेलांतून भरपूर पैसा

कमवतो, कसली कमतरता आहे तुला ? तरी तू माझ्या ऑफिसमध्ये नोकरी करतेस, रात्री बेरात्री केव्हाही बोलावलं तरी येतेस–(कोयनाजवळ जाऊन) कोयना, तू भरपूर शरीरसुख अनुभवलं आहेस– शरीरसुखाची तुला भूक आहे आणि म्हणून तू इथं येतेस– असं पण म्हणता येत नाही (दूर) कोयना, ज्यांना ज्वलंत शय्यासुखाची भूक आहे अशा स्त्रियापण मी अनुभवल्या आहेत– त्यांची ती धडपड– ती उत्सुकता– त्यांच्या मिठीतली ती ताकद, चुंबनातील आग– आणि तू– तुझ्याशी शृंगार करताना एका भांबावून गेलेल्या, काय घडतंय ह्याची जाणीव नसलेल्या चौदा वर्षाच्या भाबड्या पोरीवर बलात्कार करतोय असं वाटतं मला– तरी तू इथं येतेस– नियमितपणे येतेस– कसलीही तहानभूक नसताना येतेस– का, असं का ? (कोयनाजवळ जाऊन– तिचे खांदे पकडून– तिला उठवून) कोयना, ह्याचं उत्तर मला मिळालंच पाहिजे– तुला द्यावंच लागेल– बोल काहीतरी बोल. (कोयनाच्या खांद्यांना घुसळतो. तिच्या हातातून ग्लास खाली पडतो. अविनाश वैतागून गॅलरीत जातो. कोयना काय झाले हे न कळल्यासारखे अविनाशकडे बघते. जिन खाली सांडलेली असते. रिकाम्या ग्लासाकडे बघून हसते. परत अविनाशकडे बघते. खांदे उडवते व शांतपणे ग्लास भरते आणि गुणगुणायला लागते.)

कोयना : (स्वतःशीच गुणगुणत) ये रे ये रे पावसा,
तुला देतो पैसा,
पैसा झाला खोटा,
पाऊस आला मोठा–

(पेग भरते. संपवते. उठते. आरामखुर्चीवर बसते. परत स्वतःशीच गुणगुणत) ये ग ये ग सरी
माझं मडकं भरी
सर आली धावून,
मडकं गेलं वाहून.

अविनाश : कोयना–

कोयना : मनूताई शिर्के मॅट्रिक झाली–

अविनाश : (दरडावून) कोयना–

कोयना : टायपिस्ट म्हणून कामाला लागली.

अविनाश : (जवळ जाऊन) कोयना–

कोयना : मण्यांची पर्स हातात घेतली.

अविनाश : हं !

कोयना : नायलॉनची साडी सावरत चालली.

अविनाश : कोयना–
कोयना : इतक्यात उंदीरमामा भेटे–
अविनाश : असं ?
कोयना : ऑफिसच्या कामाचा विसर पडे.
(अविनाश हसतो.)
कोयना : (खुशीत) मनूताई लागली मामांच्या पाठी पहिल्याच दिवशी ऑफिसला बुट्टी.
(दोघेही हसतात. मनमोकळेपणे. अविनाश कोयनाला मिठीत घेण्याचा प्रयत्न करतो. तो चुकवून–)
कोयना : अविनाश, तुला मी एक प्रश्न विचारू ?
अविनाश : विचार–
कोयना : तू साऱ्या आयुष्यात कितींदा रडला आहेस आजपर्यंत ?
अविनाश : रडलो ? (विचार करून) आठवत नाही.
कोयना : अगदी ढसाढसा. ओक्साबोक्सी. असा अलीकडे कधी रडला आहेस ?
अविनाश : आठवत नाही–
कोयना : मी कालच रडत होते– कारण ऐकायचंय ?
अविनाश : तू सांगितलंस तर–
कोयना : काल मी रडले कारण...कारण...अलीकडे मी कधी रडले हे मला आठवेचना म्हणून...
अविनाश : कोयना–
कोयना : मला जास्त चढलीय असं समजू नकोस–
अविनाश : असे गोंडस गैरसमज करून घेत नाही मी कधी– अर्धी बाटली घेतलीस तरी तुला काही होत नाही हे माहितीय मला–
कोयना : सवय झालीय ना– तुला कसं झोपेच्या गोळ्यांचा काहीच परिणाम होत नाही.
अविनाश : ( दचकतो. भेदक नजरेने तिला न्याहाळतो व तिच्या रोखाने हळू हळू पावले टाकत) कोयना... तू... फार जास्त बोलतेयस आज...
कोयना : (थोडी मागे जात– घाबरत) मी... मी काही चुकीचं बोलले असेन तर...
अविनाश : (तिचा हात पकडून स्वतःकडे खेचतो. तिच्या कंबरेला विळखा घालून भाबडेपणे) कोयना, झोप ही कशी असते सांग ना मला.. पार विसरून गेलोय ग मी...
कोयना : (स्वतःला सोडवून घेत) झोप.. झोप ही काळोखाहून काळीकुट्ट असते. मादक असते... निःस्तब्ध असते. निर्विकार असते... त्या वेलवेटच्या कुशनहून मऊ असते... मुलायम असते... झोप ही एखाद्या न संपणाऱ्या

लांबलचक घसरगुंडीसारखी असते- हवीहवीशी वाटली तरी कधी संपते ह्याची वाट बघायला लावणारी- झोप ही उसाच्या रसासारखी असते- कितीही घेतला तरी परत एक अर्धा ग्लास घ्यावासा वाटणारी- झोप ही व्हॅनिशिंग क्रीमसारखी असते- लावली तरी पत्ता न लागणारी. झोप ही नाजूक संबंधांसारखी असते. झोप आली होती हे ती तुटल्याशिवाय कळत नाही.

अविनाश : आई, मला झोप येत नाही ग.

कोयना : ये बाळ, मी तुला थोपटते... तुझ्या डोक्याला थोडं तेल चोळू का ? म्हणजे छान झोप येईल बघ- ये.
(कोयना मांडी घालून बसते. अविनाश तिच्या मांडीवर डोके ठेवून पडतो. ती बाटलीतली जिन, तेलासारखी हातात घेऊन त्याच्या कपाळावर चोळते व थोपटू लागते-)

कोयना : (अंगाई गीत गाऊ लागते.)

अविनाश : आई, मला कंटाळा आलाय तेच ते गाणं ऐकून... तू... तू... काहीतरी नवीन... मस्तपैकी गोष्ट सांग ना...

कोयना : गोष्ट ?

अविनाश : हो, गोष्ट- राजाराणीची, राजकन्येची, जादुगाराची-

कोयना : सांगते हं- पण एका अटीवर- शहाण्या मुलासारखं डोळे मिटून पडून राहायचं- मध्येच उठून प्रश्न नाही विचारायचे.

अविनाश : ( लाडिकपणे ) बरं. ( कुशीवर झोपतो- डोळे मिटून- स्वस्थ ).

कोयना : एक होता राजा... एक होती राणी. त्यांना होती एक राजकन्या- नाजूक सुंदर. लांबलचक केसांची. मोठ्यामोठ्या डोळयांची. गोऱ्या गोऱ्या कांतीची. लवचिकशा बांध्याची. (अविनाश खडबडून उठतो.)

कोयना : काय झालं रे बाळ ?

अविनाश : अं .. अं . मला... मला... भूक लागलीय आई...

कोयना : हे घे हं... (व्हिस्कीची बाटली देते... अविनाश दोन घोट पितो व परत कोयनाच्या मांडीवर झोपतो. )

कोयना : (थोपटत) खूप खूप लाडात वाढली राजकन्या. आणि एके दिवशी अचानक काय झालं- राजकन्येला कळलं की आपण वयात आलो आहोत.
( अविनाश खडबडून उठतो. कोयना प्रश्नार्थ चेहऱ्याने पाहते-)

अविनाश : ( ओशाळून, लाडिक ) दूध... पाहिजे.
( कोयना परत त्याला व्हिस्की देते. अविनाश घेतो. कोयना स्वतःच्या मूड-मध्ये हरवून उठते. )

कोयना : तिच्या स्वप्नात एक राजपुत्र येतो. उंच घोड्यावर बसलेला उमदा राजपुत्र.

तिला स्वतःच्या शरीराचा भार सहन होत नाही. मुक्तपणे वाऱ्यासारखं हिंडत राहावंसं तिला वाटतं. ती आपले बांधलेले केस मोकळे सोडते. गळ्यातला रत्नहार, कानातली मोत्याची कर्णफुले, सारं सारं काढून टाकते. स्वतःच्या अंगावरचे कपडे देखील फार जड वाटू लागतात तिला– धावता धावता एकेक एकेक कपडा काढून ती वाऱ्यावर भिरकावून देते– रात्री– अंधारातून– रातकिड्यांच्या कर्कश आवाजाने भरलेल्या जंगलातून– एक वेड्यासारखी धावणारी ज्योत दिसते– राजकन्येची सुवर्णकांती तळपत असते. तिचे भिरभिरणारे केस अंधाराला कवटाळण्याच्या असफल प्रयत्नांत गुंतले असतात आणि तिच्या स्वप्नाळू डोळ्यांपुढे एकच ध्यास असतो– स्वप्नातला तो राजपुत्र (स्तब्धता)

अविनाश : मग तिला तो राजपुत्र मिळतो?
(कोयना सिगरेट काढते व तोंडात ठेवते. अविनाश चटकन पुढे होऊन लायटरने शिलगावतो.)

कोयना : थँक्यू.

अविनाश : माय प्लेझर. (स्वतः पाईप शिलगावतो.) त्या राजकन्येचं काय होतं?

कोयना : गोष्ट संपली.

अविनाश : इतक्या ॲब्रप्टली?

कोयना : निदान आजच्या पुरती–

अविनाश : पण मला झोप नाही आली अजून.

कोयना : तुला झोप येण्यासाठी– (कडवटपणे) न संपणारी गोष्टच पाहिजे.
(अविनाश भयंकर भडकतो. उद्वेग न दाखविण्याचा प्रयत्न करतो. शेवटी जिनची बाटली उचलतो नि गॅलरीतून फेकून देतो. खाली रस्त्यावर बाटली पडून, फुटण्याचा आवाज येईपर्यंत दोघे स्तब्धपणे वाट पाहत बसतात. आवाज आल्यानंतर– )

कोयना : (थोड्या वेळाने) रस्त्यात कोणाच्या डोक्यावर पडली असती म्हणजे?

अविनाश : तर मेला असता तो. सत्तीसाव्या मजल्यावरून टाकलेली भरलेली बाटली–

कोयना : तुला काहीच काळजी वाटत नाही का रे?

अविनाश : उगाच कावू नकोस. ह्या वेळेला असे आपल्यासारखे निशाचर सोडले तर कोण असणार आहे रस्त्यावर?
(फोन वाजतो.)
आहे. आणखी एका तरी माणसाचा दिवस अजून संपलेला नाही. (फोन उचलून) हॅलो...(स्तब्धता) जरा एक मिनिट थांबा हं. माझी काहीच हरकत नाही. मी त्यांनाच विचारतो. (फोनवर हात ठेवून, कोयनाला.) पणशीकरांचा फोन आहे– ते विचारतायेत. मी माझ्या बायकोशी बोलू शकतो

का ? (स्तब्धता) (फोनमध्ये) अहो, जरा थांबा, तुमची बायको विचार करत्येय– (कोयना मानेने 'हो' म्हणते)– फाईन. हियर (कोयनाला फोन देतो.)

कोयना : (हळुवारपणे) हॅलो–

अविनाश : (स्टेजच्या दुसऱ्या टोकाला) कोयना...

कोयना : (फोनमध्येच) येस डार्लिंग.

अविनाश : कोयना...

कोयना : डार्लिंग ..

अविनाश : कोयना, तू दीड वाजेपर्यंत परत येणार ना ?

कोयना : हो.

अविनाश : नक्की ?

कोयना : अगदी.

अविनाश : मी तुझी वाट बघत असेन– नेहमीप्रमाणेच.

कोयना : हाव स्वीट, डार्लिंग.

अविनाश : मी नेहमी कधी अशी वेळ देत नाही.

कोयना : मला माहीत आहे, लव्ह.

अविनाश : पण आज मात्र वाटतंय– तू अमुक वेळेच्या आत परत यावंस म्हणून–

कोयना : (किंचित वैतागून) ओ. के.

अविनाश : रागावली तर नाहीस ना माझ्यावर ?

कोयना : (वैतागून) नाही, मुळीच नाही– कीव करावीशी मात्र वाटते.

अविनाश : (साश्चर्य) कोयना–

(कोयना फोन आपटते.)

अविनाश : (पुढे येऊन, खेळकरपणे) काय म्हणतात पणशीकरसाहेब ?

कोयना : काय म्हणणार ? माझ्यासारखी बायको मिळालीय त्यांना– काय करणार बिचारे ? काळजी करत बसले आहेत.

अविनाश : त्यांना फार त्रास होत असेल नाही– दिवसभर हॉटेलात घालवायचा आणि रात्री हे असं–

कोयना : समंजस माणसाला सवय लागायला पाहिजे खरं म्हणजे आतापर्यंत.

(अविनाश आणखीन एक बाटली शेल्फवरून उचलतो आणि गॅलरीतून खाली फेकून देतो. आवाजाची दोघे वाट पाहतात. आवाज येतो. अविनाश गॅलरीत जातो. हात वर फेकतो व कोयनास.)

अविनाश : ये, कोयना ये– माझ्या कुशीत ये. माझ्या तळव्यांवर दंव बनून वितळून जा. ये, माझ्या मगरमिठीत ये नि स्वतःला विसरून जा– स्वतःच्या देखावी कवचाला मोडून टाक– तोडून टाक– कोयना (हळुवारपणे) कोयना...

(कोयना धावत येते व अविनाशच्या मिठीत शिरते. प्रकाश मंद. अविनाश कोयनेच्या शरीरावरून, केसातून, भावनाशीलतेने हात फिरवतो. कोयना डोळे मिटून, निःश्वास सोडते.)

अविनाश : (शृंगार चालू असतानाच) वितळून जा... विरघळून जा... वाऱ्यात विरून जा... शोधात हरवून जा... हरवण्यात शोधत जा... गूढात मिसळून जा. धुंदीत मिळून जा... अशब्द. निःशब्द... बोलकी... शांतता... भव्य... विश्व...सूक्ष्म...आकार...निराकार...चैतन्य.. स्तब्धता... एक...अनेक ...एक...अबोध...निर्बोध... सुबोध...बोध... भोग...विष...अमृत... पाऊस...वारा...पाणी...वादळ...सर्व... सर्वत्र...विजा...गडगडाट... शून्य...अगणित...अनंत...सर्व...सर्वत्र...

(अचानक अविनाश थांबतो. कोयनेला तिथेच सोडतो व स्वतः स्टेजच्या पुढच्या डाव्या कोपऱ्यात जातो. कोयना काय झाले हे न कळल्याने तिथेच राहते. मोठी स्तब्धता. अविनाश पाईप शिलगावतो.)

कोयना : (थोड्या वेळाने, दबलेल्या आवाजात) अविनाश... मला कधी कधी वाटतं तू जाणून बुजून मुद्दाम मला निव्वळ खेळवत असतोस—

अविनाश : मना सज्जना भक्तिपंथेचि जावे—

कोयना : विषय बदलू नकोस—

अविनाश : मना श्रेष्ठ धारिष्ट जीवी धरावे.

कोयना : माझं बोलणं ऐकतोयस तरी का अविनाश ?

अविनाश : मना बोलणे नीच सोशीत जावे.

कोयना : फार अस्वस्थ वाटतं रे मला—

अविनाश : मग कोकाकोला घे. कारण कोकाकोला रिफ्रेशेस यू बेस्ट.

कोयना : मला कोक आवडत नाही.

अविनाश : मग फँटा घे.

कोयना : हट्.

अविनाश : (कोयनाजवळ जाऊन) कोयना, जिनची इतकी सवय लागणं चांगलं नाही—

कोयना : बरं, बरं कळलं.

अविनाश : आजीबाई, आजीबाई, हातात काय ?

कोयना : हातात आहे पैसा.

अविनाश : पैशाचं तू करशील काय ?

कोयना : पैशाच्या आणीन मी शेवया

अविनाश : शेवयांचं तू करणार काय ?

कोयना : खीर करीन मी खावया.

अविनाश : खीर खाऊन तू जाणार कुठं ?
कोयना : जाणार आहे बाजाराला.
अविनाश : बाजारातून तू आणणार काय ?
कोयना : आणणार आहे गम्मत–
अविनाश : गम्मत ती ग कोणती ?
कोयना : तुम्हाला नाही सांगायची.
अविनाश : सांग सांग आजी.
कोयना : आणणार आहे काठी
अविनाश : काठी ? ती ग कशाला ?
कोयना : तुमच्या पाठीत घालायला ?
अविनाश : ( भोकांड पसरून रडू लागतो. )
कोयना : भटो, भटो–
अविनाश : ओ–
कोयना : कुठे गेला होता ?
अविनाश : कोकणात–
कोयना : कोकणातून काय आणलंत ?
अविनाश : फणस–
कोयना : कापा की बरका ?
अविनाश : कापा–
कोयना : ( अविनाशजवळ जाऊन, तळहातावर ) इथे कापू ?
अविनाश : नक्को, नक्को.
कोयना : (अविनाशच्या मांडीवर) इथे कापू ?
अविनाश : नक्को नक्को.
कोयना : (दंडावर) इथे कापू ?
अविनाश : नको नको, (अविनाश खाली बसतो. )
कोयना : (डोक्यावर) इथे कापू ?
अविनाश : हो.
कोयना : तेल लावू. धुवून काढू आणि– आम्ही खातो गरे, तुम्ही खा आठळ्या–
अविनाश : अटक मटक, चन्ने चटक, चन्ने लागले गोडगोड, जिभेला आले फोडफोड.
कोयना : (अविनाशला गोंजारत) अडगुळं मडगुळं, सोन्याचं कडगुळं, रुप्याचा वाळा, तान्ह्या बाळा, तीट लावू.
(अविनाश उठतो व सिंहासारख्या डरकाळ्या फोडत इकडे तिकडे फिरू लागतो. कोयना घाबरल्यासारखे करते. अविनाश कोयनाकडे पाहतो व डरकाळी मारतो. कोयना खूप घाबरते.)

कोयना : (थरथरत) कोण रे तू ?
अविनाश : (डरकाळी) मला ओळखत नाहीस तू ? मी सिंह.
कोयना : (सुटकेचा निःश्वास) हॅत तेरे की– सिंहच होय–
अविनाश : कमाल आहे– सिंह म्हणून सांगितल्यावर भीतीच नाही वाटत– हॅ, आज-कालचा जमानाच फार वाईट ( जाऊ लागतो. डरकाळी फोडतो– तितक्यात जोराने शिंक येते. )
कोयना : अरे अरे सिंहा.
अविनाश : (रागाने) काय आहे ?
कोयना : तुला काय सर्दी वगैरे झालीय ?
अविनाश : (लाडात पुढे येऊन) हो, सर्दी झालीय. सारख्या शिंका येतात. घसा पण बसलाय (खाकरतो.) काल शंभरपर्यंत ताप होता. डोकं पण दुखतंय (रडल्यासारखे करतो.)
कोयना : उगी, उगी, हं. रडू नकोस. जरा तपासू दे मला. हं, आ कर पाहू (करतो.) 'आ' म्हण ( म्हणतो. कोयना तपासते.)
कोयना : (विचार करून) हं, सिगरेटी फार ओढतो.
अविनाश : नेव्हर. मी फक्त पाईप ओढतो.
कोयना : तेच ते. छाती पाहू (स्टेथोस्कोप असल्यासारखे भासवून, तपासत) हां, श्वास घे– जोराने– आणखीन जोराने– (थांबवून, स्वतःशीच) कमाल आहे (परत) श्वास घे पाहू परत– खरोखरच कमाल आहे– तुझ्या छातीतनं आवाजच येत नाही कसला–
अविनाश : परत बघ.
कोयना : (परत तपासत) नाही रे– ॲब्सोल्युटली नो धडधड– तुझ्यावर पीएच. डी. चा रिसर्च करता येईल मला- परत बघू दे–(बघते) जरा गाऊन काढ पाहू-
अविनाश : ( लाजत ) लाज वाटते.
कोयना : अरे माझ्यासमोर कसली लाज ?
अविनाश : (लाजत) पण, नक्कोच ना.
कोयना : ( दरडावून ) आता काढ म्हणते ना—
(अविनाश हसतो. उभा राहतो. पाठमोरा वळतो व गाऊन अलगद खाली सोडतो. संपूर्ण नग्न. त्याच्या पाठीवर सुवर्ण प्रकाश. कोयना घाबरून, किंचाळी दाबत, पाठीमागे सरकते.)
कोयना : ( भेदरून गेलेली ) तशीच– अगदी तशीच– माझ्या त्या राजपुत्राची पाठ देखील अगदी अशीच होती- लांबसडक– सोन्यासारखी तळपणारी– आकर्षक– सूर्यबिंबासारखी- तरीपण गोंजारावंसं वाटणारी– स्वतःचं सगळं शरीर विलीन करून टाकावंसं वाटणारी– माझं– माझं- प्रेम होतं त्या राज-

पुत्रावर- पण- पण- तो राजपुत्र मागे वळला आणि (अविनाश मागे वळतो. मोठे स्मित. )- आणि त्याच्या नजरेस नजर भिडताच मला कळून चुकलं की हा राजपुत्र नाहीच- इतके भयानक, फसवे, गहिरे डोळे राजपुत्राचे असूच शकत नाहीत- तो... तो... जादूगार होता- मायावी जादूगार- केवळ आपल्या नजरेने माणसांना जन्माचा बांधून टाकणारा- जादूगार- ( अविनाश कोयनाजवळ येऊ लागतो) नको- तू माझ्या जवळ येऊ नकोस- तू जादूगार आहेस- दूर जा तू- दूर (अविनाश कोयनाच्या केसांतून हात फिरवतो कोयना दूर होते.) नाही- नाही- तू मला ठार मारणार आहेस- मला मारायचंय तुला - मला माहीत आहे- मला माहीत आहे-

अविनाश : ( अगदी शांतपणे) कोयना- (हात पुढे करतो. काही वेळ स्तब्धता)

कोयना : (न राहवून) अविनाश (त्याचा हात पकडते. कुरवाळते. हाताचे चुंबन घेते व स्वतःभोवती त्याच्या हाताचा विळखा घालून घेते.)

अविनाश : (शांतपणे ) कोयना -

(कोयना अविनाशला जाऊन बिलगते. इतक्यात दारावरची कॉलबेल वाजते. दोघे दाराकडे बघतात. काही क्षण स्तब्धता. परत बेल वाजते. कोयना स्वतःला सोडवून घेते. केस सावरते. साडी नीट करते. दाराकडे जाते. अविनाश हसत हसत सगळे बघत असतो. त्याच्याकडे कोयनाचे लक्ष जाते. ती परत येते. अविनाशला त्याचा खाली पडलेला गाऊन उचलून घालते अविनाश तटस्थ- हसत- कोयना जाते व दार उघडते. दारात राहुल- गोंडस निरागस, बालिश दिसणारा अविनाशचा कंपॅनियन. )

कोयना : (निराश) ओह, इटस यू- व्हॉट अ सरप्राईज.

राहुल : (प्रवेशून कोयनेस. ) तुम्ही इथे असाल ह्याची कल्पना नव्हती. ( पुढे येतो, अविनाश अजून पाठमोराच. राहुल घुटमळतो. ) अं... मी... तुम्हाला... आय मीन... तुमचं काही महत्त्वाचं काम चालू असेल तर मी... निघतो.

कोयना : नाही, काम काही तसं महत्त्वाचं नाही. पण आता मी आहेच- मग कंपॅनियनची तशी काही आवश्यकता नाही.

राहुल : दॅटस् ओ. के. मी निघतोच. मला आज बोलावलं नव्हतं. पण वाटलं की जरा चेक करून ( अविनाशकडे जातो. पण मागे फिरतो. )- अच्छा. अविनाशला सांगा मी येऊन गेलो म्हणून-

कोयना : अवश्य. (राहुल जायला निघतो. )

अविनाश : कोण राहुल ? अरे वा, वा- निघालास कुठं ? ये, आत ये ना- असा दारातच का उभा ?

राहुल : पण... पण...

अविनाश : अरे पण काय ? ही ? ये, मी तुझी ओळख करून देतो. कोयना, हा माझा कंपॅनियन- राहुल. राहुल, ही माझी सेक्रेटरी- कोयना.

राहुल : ओळखतो मी त्यांना.

अविनाश : खरंच ?

कोयना : (वैतागून) कितीदा तरी भेटलो आहोत आम्ही- इथंच- तुझ्यामुळे-

अविनाश : ठीक आहे, ठीक आहे, पुन्हा ओळख करून दिली म्हणून बिघडतं थोडंच ? (दोघांचे हात पकडून, आत खेचून आणतो) आपण... आपण तिघे मिळून काही तरी गंमत करूया- काय ?

राहुल : भेंड्या लावूया ? गावाच्या ?

कोयना : शी !

राहुल : मग गाण्यांच्या ?

कोयना : आयड रादर गो टु स्लीप-

राहुल : देन डू दॅट- मी आणि अविनाश खेळू. का रे अविनाश ?

अविनाश : अरे, असे भांडता काय लहान मुलांसारखे ?

राहुल : मग आता बघ ना- ह्या कशा करतात ते-

कोयना : अविनाश, तू ह्या बोअरला पैसे देऊन कंपॅनियन ठेवलंयस ?

राहुल : यू- माईंड युअर ओन बिझिनेस.

कोयना : अविनाशस बिझनेस इज माय बिझनेस.

अविनाश : शटाप, बोथ ऑफ यू. आल्या आल्या कटकट सुरू.

राहुल : आय ॲम सॉरी अविनाश- मी इथं-

अविनाश : इनफ. (हळुवारपणे) राहुल, तू आज मी न बोलावताच कसा काय आलास ?

कोयना : सवय पडलीय-

अविनाश : आय डिंट आस्क यू, कोयना-

राहुल : पण बरोबर आहे त्यांचं. एक प्रकारची सवयच लागलीय म्हण ना- अविनाश, इतक्या मगरूर, लांबलचक रात्री मी तुझा कंपॅनियन म्हणून- (किंचित वैतागून) तुझा पेड कंपॅनियन म्हणून घालवल्या आहेत- फक्त तुला ऑक्यूपाईड ठेवण्यात- तुझ्या निद्रानाशाचा तुला विसर पडण्यासाठी-

अविनाश : बस- बस- कळलं -

राहुल : खरंच रे अविनाश- तुझ्या सर्वव्यापी सोबतीची इतकी सवय लागली आहे-

कोयना : (गंभीर होऊन) राहुल- (राहुलच्या जवळ जाऊन) टेक केअर, इतकं हळवं होणं चांगलं नाही-

राहुल : तुमच्या सल्ल्याची मला गरज नाही.

कोयना : ठीक आहे, राहिलं आमचं-

अविनाश : राहुल, कोयना तुला राहुल म्हणते- तू म्हणते- आणि तू मात्र तिला तुम्ही म्हणतोस- तू का नाही म्हणत ?

राहुल : (विचार करून, कोयनाच्या जवळ जाऊन ) तू. (अविनाशला) इज दॅट व्हॉट यू वॉण्ट ?

अविनाश : ग्रेट. निदान आपल्या तिघांत तरी असंच खेळीमेळीचं वातावरण राहिलं पाहिजे. काय ? (स्वतःवरच खूष) खरंच, आपण तिघे मिळून काही तरी... काही तरी खेळूया...

राहुल : रमी खेळूया ?

कोयना : रमी ? बापरे !

राहुल : तुम्हाला नाही यायचं तर नका येऊ.

अविनाश : राहुल–

राहुल : तुला यायचं नसेल तर नको येऊस–

अविनाश : दॅटस बेटर.

कोयना : काय ? तू रमी खेळत बसणार अविनाश ?

अविनाश : (हसून ) नाही ग. काळजी करू नकोस. आपण काहीतरी नवीन, काहीतरी डायनॅमिक केलं पाहिजे–

राहुल : आपण पकडापकडी खेळूया ?

कोयना : गुडनेस ग्रेशस– आता पकडापकडी (अविनाशला) अविनाश, प्लीज एस्क्यूज मी– तुम्ही पकडापकडी खेळा– मी जातेच इथनं कशी– (पर्स उचलते. कपडे नीट करते ) बाय, अविनाश, बाय राहुल (जाऊ लागते.)

राहुल : गुडबाय-

अविनाश : (अगदी नाटकीपणे) थांब लक्ष्मी– अशी भरल्या संसारातून निघून जाऊ नकोस- बाळ राहुल, तुझी आई, आपल्याला सोडून चालली बघ रे! लक्ष्मी, अशी आम्हा दोघांना वाऱ्यावर टाकून जाऊ नकोस ग ! माझी नाही तर आपल्या बाळाची तरी आठवण ठेव– (राहुलला खुणावतो. राहुल हंबरडा फोडतो.)

राहुल : आई, ए, माझे आई– अशी आम्हाला सोडून नको ग जाऊस– तू गेलीस तर माझं काय होईल ? माझ्या बाबांचं काय होईल–

अविनाश . बघ लक्ष्मी, जरा तरी माणुसकी दाखव– पोटच्या गोळ्याला अशी टाकून जाऊ नकोस ग– पाहिजे तर मी तुझा अपमान केल्याबद्दल क्षमा मागतो ग !

कोयना : ( मूडमध्ये येत) माझ्या पाया पडशील ?

अविनाश : साष्टांग लोटांगण घालेन–

कोयना : हाव थ्रिलिंग. मग मी राहतेच मुळी– (पर्स सोफ्यावर फेकते व परतते.)

राहुल : (वेडावत) आ–ई–

कोयना : (राहुलला) शटाप्–
राहुल : (अविनाशला) बाबा, आई बघ मला शटाप–
अविनाश : (राहुलला) शटाप– (कोयनाला, गंभीर) कोयना, मी तुला आज कशासाठी बोलावलं होतं हे लक्षात आहे तुझ्या ?
कोयना : ओह् यॅस (हसत) अर्जंट– व्हेरी अर्जंट डिक्टेशन घ्यायला– (खिदळते.)
अविनाश : मग तुझं पॅड व पेन्सिल कुठंय ?
कोयना : पॅड ? पेन्सिल ?
अविनाश : (टेबलावरचे पॅड उचलतो. कोयनेकडे भिरकावतो. कोयना निमूटपणे लिहू लागते)

With reference to your letter dated such and such –I regret to inform you that it will not be possible for us– to entertain your order– as the raw materials required for fulfilling your order are strictly controlled by the Government and we have already utilized our quota. I can assure you that we serve our customers strictly on the basis of first come first served. I hope that in future we will be able to be of some assistance to you provided of course you book your order about eight months in advance. With regards. Yours sincerely etc. etc.

कोयना : येस सर. पण इथं टाईपरायटर कुठाय ?
अविनाश : राहुल—
राहुल : येस, अविनाश ?
अविनाश : टाईपरायटर बन.
राहुल : वॉव. मी टाईपरायटर ! (कोयनाच्या पुढे जाऊन बसतो.)
अविनाश : बघतेस काय माझ्याकडे ? प्रोसीड टू टाईप.
(कोयना पेपर व कार्बन लावल्याचे भासवते व राहुलच्या पाठीवर टायपिंग सुरू करते. राहुल तोंडाने टाईपरायटरसारखे आवाज काढतो. अविनाश पाईप शिलगावतो.) टायपिंग झाल्यानंतर कोयना कागद काढते व अविनाशला देते.)
अविनाश : (कागद वाचत) एंटरटेनचं स्पेलिंग काय ?
कोयना : सर, सर– तो टाईपरायटर खराब झालाय–
अविनाश : (वाचत) बेसिस फर्स्ट ? मधलं ऑफ कुठं गेलं ?
कोयना : त्या टाईपरायटरनं खाल्ला वाटतं एक शब्द.
अविनाश : (वाचत, ओरडून) सिन्सिअरलीचं स्पेलिंग चुकलंय–
कोयना : सर, तो टाईपरायटर–

ग्र. क्र.
प्रा. क्र.
दि.



अविनाश : टाईपरायटर ? बिघडलाय वाटतं ? (राहुल जवळ जातो. त्याच्या कपाळाला हात लावून) हं… बिघडलाच आहे– नर्स.

कोयना : येस डॉक्टर–

अविनाश : ऑपरेशनची तयारी करा–

राहुल : पण डॉक्टर… ऑपरेशनशिवाय नाही का चालणार ?

अविनाश : आय विल डिसाइड दॅट. तुला मध्ये मध्ये बोलण्याची गरज नाही. नर्स– गिव मी अ हॅन्ड.

(कोयना व अविनाश राहुलला आडवे उचलून सोफ्यावर ठेवतात.)

अविनाश : क्लोरोफॉर्म–

(कोयना धावत जाऊन घेऊन येते. राहुल उठायचा प्रयत्न करतो. अविनाश त्याच्या नाकाला क्लोरोफॉर्म लावतो. राहुल पडतो.)

अविनाश : माझा एप्रन. (कोयना आणून बांधल्यासारखे करते. धावपळ) सिझर्स– (कोयना देते) प्लायर्स– (कोयना देते) (अविनाश ऑपरेशन चालूच ठेवतो.) ट्यूब्स– सिझर्स– इंजेक्शन– सिझर्स– नेलकटर

कोयना : काय ?

अविनाश : नेलकटर– (कोयना आणून देते. अविनाश शांतपणे पुढे येऊन स्वत:ची नखे कापतो. राहुल उचकी द्यायला लागतो.)

कोयना : (धावपळ) डॉक्टर, डॉक्टर– रोगी उचकी देतोय–

अविनाश : दोन पेग स्कॉच पाज त्याला (कोयना पाजते. राहुलची उचकी थांबते. खोकायला लागतो.)

कोयना : (धावपळ) डॉक्टर, डॉक्टर– रोगी खोकतोय–

अविनाश : (शांतपणे– नखे कापतच) त्याला सांग खोकू नकोस.

कोयना : (राहुल) खोकू नकोस. (राहुल खोकायचे थांबतो.)
(राहुल जवळ जाऊन, न्याहाळून. धावपळ) डॉक्टर, डॉक्टर, रोगी निपचित पडलाय–

अविनाश : (दचकून) काय ? (राहुलजवळ जाऊन) नर्स– कात्री– पकड– हातोडी– करवत– (ऑपरेशन करून) ऑक्सिजन– (कोयना सिलेंडर आणते) ठीक आहे– ही इज आउट ऑफ डेंजर–

कोयना : (अविनाशचे चुंबन घेऊन) डॉक्टर, यू आर अ जिनिअस–

अविनाश : (लाजून) नॉट हियर, नर्स, नॉट हियर. (लिपस्टिक पुसल्यासारखे करतो आणि कोयनाच्या कमरेस विळखा घालून दोघे जाऊ लागतात.)

राहुल : (ओरडून, अर्धवट बसून) डॉक्टर, डॉक्टर– तुमच्या कात्र्या वगैरे

अविनाश : ओह. विसरलोच. (कात्र्या वगैरे काढतो. कोयना त्या ठेवून देते. राहुलच्या गालावर चापटी मारून) चिअर अप, बॉय– तुला विशेष

काहीच झालेलं नाही– घशाला थोडसं इन्फेक्शन झालंय– दिवसातून तीन वेळा ह्या स्ट्रेप्सिल्स घेत जा– (खिशातून- आता मात्र खऱ्या– स्ट्रेपिल्स काढून देतो. अविनाश व कोयना निवतात. राहुल स्ट्रेप्सिल्स तोंडात टाकतो.)

राहुल : त्वरित गुण– स्ट्रेप्सिलने– (इकडे तिकडे धावतो. दंड ताठ करून पाहतो, वगैरे.)

अविनाश : (कोयनाला) अहो, तुमच्या यजमानांची ओळख करून द्या ना जरा–

कोयना : आमचे हे ना ? भारीच बाई करतात ते. (राहुलला) अहो, अहो...

राहुल : कोणाची बरं ही मंजुळ हाक ?

कोयना : अहो मीच नाही का ?

राहुल : कोण तू अप्सरे ?

कोयना : असं वेंधळ्यासारखं करू नका (राहुल खजील) जरा नीट उभे राहा (राहतो.) आणि तो शर्ट आत खोचा (खोचतो.) अहो– हेच ते डॉक्टर ज्यांनी तुम्हाला खणखणीत बरं केलं– फारच हुशार आहेत हं– आणि डॉक्टर हे (विनयाने लाजून) आमचे हे–

अविनाश : ग्लॅड टू मीट यू–

राहुल : सेम हियर– आणि थँक्यू डॉक्टर, तुमच्या हाताची कमाल म्हणून मी ठीक झालो. मोठे जादूगारच आहात तुम्ही–

कोयना : (दचकून, उडून, अस्फुट किंचाळून) जादूगार ? राहुल, तुला पण– तू पण– (कोपऱ्यातल्या टेबलापाशी जाते. जिन घेते व आरामखुर्चीत कोसळते. डोळे मिटून पडून राहते.)

राहुल : झालं काय हो आमच्या हिला ?

अविनाश : काही विशेष नाही– आनंदाचा धक्का बसला असावा तिला–

राहुल : डॉक्टर, मी तुम्हाला कुठंतरी—

अविनाश : पाहिल्यासारखं वाटतंय ना ? मी अगदी तेच म्हणणार होतो.

राहुल : अविनाश ?

अविनाश : राहुल ?

राहुल : व्हॉट अ बिउटीफुल सर्प्राईज—

अविनाश : आपण एकाच शाळेत होतो नाही ?

राहुल : एकाच वर्गात.

अविनाश : आणि एकाच कॉलेजात होतो–

राहुल : एकाच हॉस्टेलमध्ये– रूम पार्टनर्स–

अविनाश : (जवळ जात) तू अगदी होतास तसा आहेस रे–

राहुल : तुझ्यात देखील अजिबात बदल नाही–

अविनाश : वयाप्रमाणे बदल बायकांत होतो– पुरुषांत नाही–

राहुल : अविनाश, तुला आठवतं, आपण ट्रेकिंगला गेलो होतो–

अविनाश : अफ कोर्स - पिंडारी ग्लेसियरला–

राहुल : पिंडारी ग्लेसिअर- (आठवत) काय मजा आली होती नाही ? सगळीकडे बर्फच बर्फ- बर्फाची आधी भीती वाटली– मग मात्र ग्लेसिअरवरून खाली आणि खालून वर धावायला देखील काहीच वाटायचं नाही.

अविनाश : तुला बर्फावरून घसरलेला पाहून मी हसतो ना हसतो तेवढ्यात मी घसरायचो–

राहुल : पण पिंडारीला पोचायच्या आधी काय ते चढण– आठवण आली तरी अजून शहारा येतो अंगावर–

अविनाश : बट वुई क्लाइंब्ड इट–

राहुल : अफ कोर्स, वुई क्लाइंब्ड इट- (थांबून) अविनाश–

अविनाश : येस ?

राहुल : तू अजून होता तेवढाच 'मूडी' आहेस का ?

अविनाश : मी 'मूडी' ? छे. मी 'मूडी' कधी होतो ?

राहुल : छान. म्हणे 'मी मूडी कधी होतो'– तुझं प्रत्येक बोलणं, प्रत्येक वागणं विक्षिप्तपणाचं होतं– तू कधी काय करशील ह्याची कसलीच गॅरंटी नव्हती. ॲबसल्युटली अनप्रेडिक्टेबल– 'अनप्रेडिक्टेबल अविनाश' किताब होता तुझा, विसरलास ? तू कधी चिडशील, कधी हसशील, कधी वेड्यासारखा ॲग्रेसिव्ह बनशील, कधी साळसूदपणे निमूट ऐकशील, काय कधी कुणाला सांगता यायचं ? (हे सगळे बोलत असताना अविनाश चेहऱ्यावर एक रुंद हास्य ठेवून, राहुलच्या खांद्यावर हात ठेवून, त्याच्या जवळ जवळ जातो आणि किंचित त्याला पुढे खेचल्यासारखे करतो. शेवटच्या शब्दांच्या वेळी दोघांच्या ओठांमधले अंतर जेमतेम दोन इंच आहे. इथे काही वेळ थांबावा. मग) एक्सेप्ट परहॅप्स मी–

अविनाश : (त्याच पोझिशनमध्ये) एक्सेप्ट परहॅप्स तू काय ?

राहुल : तू पुढल्या क्षणाला काय करणार आहेस हे परहॅप्स मी एकटाच ओळखू शकतो–

अविनाश : (जोराने राहुलला ढकलून देऊन)– रबिश–

राहुल : (ओरडून) अफ कोर्स, आय कॅन. तू कितीही नाही म्हटलंस तरी आय कॅन.

अविनाश : (शांतपणे) बुलशिट–

राहुल : डोण्ट डिनाय इट. जे खरं आहे ते खरं मान– मी तुला ओळखू शकतो. आय नो यू वेल–

अविनाश : तू मला ओळखू शकला असता- मी कोण आहे, कसा आहे हे खरोखरच तू ओळखलं असतं तर तू इथं कधीच आला नसतास–

राहुल : ( काही वेळाने, स्वतःवर चिडून ) इथं येणं माझ्या हातात थोडंच आहे ? आपोआप खेचला जातो मी इथं– माझी इथं न येण्याची इच्छा नसते की येण्याचीही नसते– पण तुझी नजर– तुझे डोळे– अगदी आपोआप–

( अविनाश हसतो. कोयना जागी होते. ग्लासमध्ये ओतत गुणगुणते. )

कोयना : (आपल्याच नादात, हातात ग्लास )

थुई थुई नाच माझ्या अंगणात मोरा
निळया निळया पिसांचा तू फुलव पिसारा
(संपूर्ण कविता म्हणते.)

( कविता चालू असताना राहुल व अविनाश दोघे कोयनाकडे पाहत. पण अगदी स्तब्ध. )

राहुल : ह्या... ह्या... कोयनापेक्षा जास्ती ओळखतो मी तुला– आय कॅन प्रेडिक्ट द अनप्रेडिक्टेबल अविनाश– शी काण्ट.

कोयना : (स्वतःशीच) आय काण्ट ? (हसते.)

राहुल : आय नो इट. कोयना, कोयना, तुम्ही सांगा-

अविनाश : राहुल–

राहुल : कोयना तू सांग- अविनाश आता काय करणार आहे ? (कोयना नवा पेग भरते. राहुल खूष) येत नाही ! हा, हा, मी सांगतो– अविनाश आता पाईप शिलगावणार आहे– हा, हा-

कोयना : मूर्ख आहेस.

राहुल : कोण मी ?

कोयना : अविनाश आता तुझ्या थोबाडीत मारणार आहे-

राहुल : ( हसतो) अविनाश. माझ्या... थोबाडीत... (हसत, अविनाशसमोर जातो. अविनाश शांतपणे पण जोराने त्याच्या थोबाडीत मारतो. राहुल कोलमडतो. एकदम खलास. खाली पडतो. वर पाहत नाही.) (बराच मोठा विसावा)

अविनाश : कोयना– (तिच्याकडे न बघता, गोळ्यांची बाटली व पाण्याचा ग्लास उचलत, बोलत) त्याच्या जिव्हारी लागलंय- ह्याला जबाबदार तू आहेस– त्याची काळजी घे– मी जरा झोप लागते का प्रयत्न करून पाहतो– (चार गोळ्या घेतो. आत निघून जातो.)

कोयना : (राहुलजवळ जाऊन, खाली बसून) राहुल- (राहुल वर बघतो. कोयनाकडे नाही. नीट बसतो. परत मान गुडघ्यामध्ये घालतो) राहुल– फार लागलं कारे तुला ?

राहुल : तुझ्या सिंपथीची मला गरज नाही-
कोयना : असं काय करतोस रे- लागलं तुला ?
राहुल : लागलं ते गालाला नाही-
कोयना : कल्पना आहे मला--
राहुल : तुला काय खाक कल्पना आहे-
कोयना : प्लीज राहुल- माझ्याशी बोलताना निदान माझ्याकडे पाहा तरी-
राहुल : एकदा अविनाशच्या नजरेला नजर भिडवली की मग कुणाकडे पाहायला जमतच नाही—
कोयना : तरी पण प्रयत्न करून बघ-
राहुल : दीडदमडीची औरत तू- मला ॲडवाईस देऊ नकोस- (गुडघ्यात मान)
कोयना : खरं आहे. मी तुला कोण काय सांगणार ? अगदी साधी मुलगी तर आहे मी- इतरांपेक्षा वेगळं विशेष काहीच नाही- इतरांच्या सारखीच जन्माला आले- इतरांच्या सारखीच शाळेत गेले, कॉलेजात गेले, मोठी झाले- आईवडिलांनी एका श्रीमंत, सज्जन, हॉटेलमालकाशी लग्न ठरवलं, मी खुशीनं केलं- फक्त-
राहुल : (मान वर करून) फक्त काय ?
कोयना : फरक एवढाच की मला अविनाश भेटला- खरं म्हणजे सगळ्यांना कुठं ना कुठंतरी अविनाश हा भेटतोच- पण मला भेटला तो कॉन्संट्रेटेड अविनाश. (हसते.)
राहुल : (स्वतःशीच खिन्नपणे हसून) कॉन्संट्रेटेड अविनाश-
कोयना : तुला कल्पना आहेच. ह्या अशा अविनाशमुळे किती फरक पडतो ते- अविनाश चक्क मनच गहाण मागतो- काहीकाहींना कॉम्प्रोमाईज जमतो- काहींना जमत नाही- ज्यांना जमत नाही त्यांचं मन, स्वतः विचार करायची शक्ती, स्वतःचं जीवन स्वतः पाहिजे तसं जगण्याचं साधं सुख- सगळं सगळं- एका अविनाशच्या एका नजरेत खाक होतं.
राहुल : पण असं खाक होण्यात देखील एक वेगळंच सुख आहे-
कोयना : (राहुलचा हात पकडून) खरं आहे- खाक होण्यात देखील सुख आहे- म्हणून तर अविनाश हवाहवासा वाटतो-
राहुल : बाई, माझा हात-
कोयना : राहुल-
राहुल : आधी हात सोड मग बोल-
कोयना : (न सोडताच) राहुल, लेटस गो टु बेड टुगेदर- यू ल फील मच बेटर-
राहुल : कोयना-
कोयना : (हाताचे चुंबन घेऊन) व्हाय नॉट, राहुल ?

राहुल : पण अविनाश–
कोयना : ( हताश ) येस अविनाश– (हात सोडते.)
( इतक्यात आतून अविनाशचा ' बंपेरीबंपेरी भम ' वगैरे मोठ्याने गाण्याचा आवाज येतो. राहुल चरकतो. कोयना आहे तशीच. )
राहुल : अविनाश जागा झालाय–
कोयना : झोप आली असेल तर जागा होणार ना–
राहुल : तो येतोय इथं–
कोयना : म्हणून काय झालं ?
राहुल : तुम्हा बायकांना अक्कल म्हणजे– ( लांब कोपऱ्यात जातो. )
( कोयना हसते. अविनाश ' बंपेरी भम ' गात प्रवेशतो. )
अविनाश : छ्या, झोपेचा पत्ताच नाही– ( दोघांना लांब लांब उभे पाहतो. ) अरे, तुम्ही दोघे, असे इतके– लांब लांब का उभे ? (स्वतःशीच हसून ) आता इतकं एकमेकांपासनं दूर असण्याचा अर्थ काही क्षणांपूर्वी तुम्ही अगदी जवळ होता - काय बरोबर ?
(राहुल अस्वस्थ ) दॅटस इंटरेस्टिंग– दॅटस ग्रेट– कसली वरं कारस्थानं चालली होती तुमची ? (विचार करून ) मला ठार मारण्याची ? ( हसत ) सांगून ठेवतो– मला मारण्यासाठी माझ्या व्हिस्कीत झोपेच्या गोळ्या टाकण्याचा वालिशपणा मात्र करू नका– सगळ्या पचवून जगेन मी - (दोघांकडे पाहून) अरे हे काय– एवढे अस्वस्थ का तुम्ही दोघे ? मी आपला जोक करतोय.
कोयना : व्हिम्जिकलच आहेस.
राहुल : ( गाल चोळत ) अनप्रेडिक्टेबल अविनाश–
अविनाश : ( एकदम आठवून ) लेटस सेलिब्रेट–
राहुल : सेलिब्रेशन कशासाठी ?
अविनाश : ह्या फ्लॅटमध्ये सेलिब्रेशनला कारण लागतंच असं काही नाही– ग्लास आण.
राहुल : ओह... येस... ( ग्लास घेतो. कोयना पण ग्लास आणते. अविनाश तिघांना ओततो. तिघे ' चिअर्स 'साठी ग्लास वर करतात– तोच घड्याळात एकचा टोला वाजतो. )
राहुल : एक वाजला–
कोयना : ( घाबरून ) दीड वाजला.
अविनाश : साडेबारा वाजले–
कोयना : नाही, मला निघालंच पाहिजे–
अविनाश : घाई कसली ? दीड वाजायला अजून बराच वेळ आहे– चीयर्स–
राहुल : चीयर्स–

कोयना : ( नाखुशीनेच ) चीयर्स-
अविनाश : ( मूडमध्ये ) आमच्या डोक्यात एक आयडिया आली आहे- (घोट घेतो.) इथले सगळे लाईटस बंद करायचे ( घोट ) आणि फक्त ओठांच्या स्पर्शाने एकमेकांना ओळखायचं... काय, कशी वाटते ?
कोयना : ग्रेट.
अविनाश : राहुल ?
राहुल : येस, ॲज यू प्लीज.
(अविनाश लाईटस बंद करतो. स्टेजवर संपूर्ण काळोख. तिघे इतर दोघांची नावे ओळखतात. मधून मधून सारखा हशा. गोंगाट. चॅकॉस्कीचं म्युझिक सुरू होतं.)
( अंधारातच )
कोयना : रेकॉर्ड प्लेअर कोणी सुरू केला ?
राहुल : मी केला– मला राहवेना–
अविनाश : ग्रेट– काळोखात चॅकॉस्की ऐकण्याचा मजा काही औरच असतो.
कोयना : ए, थोडा वेळ लाईट लाव ना, मला ग्लास भरायचाय–
राहुल : आयल गेट इट–
अविनाश : कोयना, कुठं आहेस तू ?
कोयना : ही काय तुझ्या मागे– (हसते.)
अविनाश : कोयना, झोप देखील अशीच असते का ग ? काळीकुट्ट–
कोयना : जर स्वप्न पडलं नसेल तर-
राहुल : ( ओरडून ) ए चिमटा कोणी काढला–
अविनाश : ओह, सॉरी हं. तुझा हात होता काय ? मला वाटलं कोयनाचा.
कोयना : (खिदळून) नाव, स्टॉप इट, राहुल.
अविनाश : इटस मी– अविनाश.
(कर्णकर्कश बेल वाजते.)
अविनाश : कोण आलं ह्या वेळेला ? स्पॉईल स्पोर्ट साला– (लाईटस लावतो. कोयना व राहुल आपले कपडे नीटनेटके करत असतात. अविनाश रेकार्डप्लेअर बंद करतो.) बेल वाजवणारा जो कोणी स्ट्रेंजर असेल त्याच्या नावाने आधी आपण टोस्ट करू या— ग्लास आणारे– (कोयना व राहुल आपापले ग्लास आणतात. अविनाश तिघांचे ग्लास भरतो. तिघे ग्लास वर करतात.) स्ट्रेंजरसाठी- (इतक्यात परत एकदा बेल वाजते.) साला, काय दळभद्री स्ट्रेंजर आहे. थांबायलाच तयार नाही– चांगला सस्पेन्स वाढत होता– (ग्लास टेबलावर ठेवतो. दार उघडतो. दारात पणशीकर. चेहऱ्यावर खोटे हसू. काळी टोपी. एकंदर अवतार) कोण पणशीकर ? वा, वा, वा, कमिन,

कमिन–

पणशीकर : (दारातच) मला माफ करा– हॅ, हॅ... आपल्याला उगाच त्रास दिला हॅ हॅ हॅ. पण त्याचं काय आहे की–

अविनाश : अहो, असे दारातच का उभे ? आत या. मी तुमची ओळख करून देतो. पणशीकर, हे राहुल, राहुल, हे पणशीकर. पणशीकर ही तुमची बायको कोयना. कोयना, हे तुझे यजमान पणशीकर...

पणशीकर : हॅ हॅ हॅ. फारच विनोदी स्वभाव बुवा तुमचा. आपल्याला आवडला.

अविनाश : (एकदम गंभीर होऊन) पण पणशीकर. तुम्ही अगदी वेळेवर आलात– इथं फार भयंकर घटना घडणार होती नाहीतर.

पणशीकर : काय हो, काही विपरीत तर...

अविनाश : (घाबरून) तुमची बायको कोयना– हिनं ह्या राहुलच्या ग्लासात आणि ह्या राहुलनं तुमच्या बायकोच्या ग्लासात झोपेच्या गोळयांचा डबल डोस टाकला आहे– विष, पणशीकर, पॉयझन...

(सगळे ‘ फ्रीझ ’ होतात. )

(चॅकॉस्कीचे संगीत)

**प ड दा**

# उत्तरार्ध

( पूर्वार्धातले दृश्य. अविनाश-कोयना व राहुल तिघे ग्लास वर करून उभे आहेत. )

अविनाश : स्ट्रेंजरसाठी (बेल वाजते.)
साला, काय दळभद्री स्ट्रेंजर आहे. थांबायलाच तयार नाही– चांगला सस्पेन्स वाढत होता– ( ग्लास टेबलावर ठेवतो. दार उघडतो. दारात पणशीकर. चेहऱ्यावर खोटे हसू. काळी टोपी. एकंदर अवतार ) कोण पणशीकर ? वा, वा, वा, कमिन, कमिन–

पणशीकर : (दारातच) मला माफ करा– हॅ, हॅ... आपल्याला उगाच त्रास दिला हॅ हॅ हॅ. पण त्याचं काय आहे की -

अविनाश : अहो, असे दारातच का उभे ? आत या. मी तुमची ओळख करून देतो. पणशीकर, हे राहुल, राहुल, हे पणशीकर. पणशीकर ही तुमची बायको कोयना. कोयना, हे तुझे यजमान पणशीकर...

पणशीकर : हॅ हॅ हॅ. फारच विनोदी स्वभाव बुवा तुमचा. आपल्याला आवडला.

अविनाश : ( एकदम गंभीर होऊन ) पण पणशीकर. तुम्ही अगदी वेळेवर आलात– इथे फार भयंकर घटना घडणार होती नाहीतर.

पणशीकर : काय हो, काही विपरीत तर...

अविनाश : (घाबरून) तुमची बायको कोयना - हिनं ह्या राहुलच्या ग्लासात आणि ह्या राहुलनं तुमच्या बायकोच्या ग्लासात झोपेच्या गोळ्यांचा डबल डोस टाकला आहे– विष, पणशीकर पॉयझन...

पणशीकर : विष ? एकमेकांच्या ग्लासात... पण का ?

अविनाश : ते त्यांनाच विचारा– पणशीकर, तुमच्या बायकोला विचारा.

पणशीकर : हॅ हॅ, तुम्ही... तुम्ही... थट्टा करताय हो माझी ? असली क्रूर थट्टा आपल्याला नाही हो पचत - हां...

अविनाश : काय कोयनाबाई - राहुलसाहेब - पणशीकरना खरं काय ते सांगायचं का–

पणशीकर : नको, नको, राहू दे तुमचं काय असेल ते. आता प्रसंग टळलाच आहे ना.

अविनाश : का पणशीकर ? सत्याला सामोरे जायला घाबरता ?

राहुल : पणशीकर, तुमची-माझी काही तशी ओळख नाही– पण–पण मी सांगतो– की आपले... आपले... अविनाश गंमत करताहेत म्हणून–

पणशीकर : हो ना ? मग झालं तर– (राहुलला) तुमचं नाव काय म्हणालात ?

राहुल : राहुल–

पणशीकर : वा ! मुंबईचेच वाटतं ?

राहुल : प्रॅक्टिकली.

कोयना : (राहुलला) कशाला उगाच फसवणूक करतोस त्यांची ?

राहुल : कोयना ?

अविनाश : येस कोयना, स्पीक अप–

कोयना : राहुलच्या ग्लासात मी झोपेच्या गोळ्या टाकल्या होत्या.

राहुल : गुडनेस.

पणशीकर : पण का विचारतो मी ?

कोयना : अविनाशनं सांगितलं म्हणून–

राहुल : अविनाश ? रिअली ?

अविनाश : (विसावा घेऊन) मना सर्वथा सत्य सांडू नको रे
मना सर्वथा मिथ्य मांडू नको रे

राहुल : अविनाश, आणि मला तू सांगितलंस कोयनाच्या ग्लासात विष टाकायला–

कोयना : व्हॉट ?

पणशीकर : अविनाश साहेब, मला... मला... काही समजतच नाहीय हे काय चाललंय–

अविनाश : (शांतपणे) मना मानसी दुःख आणू नको रे
मना सर्वथा शोक चिंता नको रे

कोयना : राहुल, तू माझ्या ?

राहुल : हो, तुझ्या ग्लासात पण झोपेच्या गोळ्यांचा डबल डोस होता.

कोयना : (अविनाशजवळ जाऊन, उद्वेगाने) का, अविनाश– का ? हा विश्वासघात झाला– अगदी आयत्या वेळी– सगळी तयारी झाली असताना– का थांबवलंस आम्हाला तो विषारी घोट घेण्यापासून ?

अविनाश : (शांतपणे) मना सज्जना एक जीवी धरावे
जनी आपुले हीत तुवा करावे.

पणशीकर : मला कुणी समजावून सांगेल का रे–

राहुल : कोयना, तुला खरोखरच... खरोखरच... हवं होतं...

कोयना : इनएव्हिटेबलशी झुंज देण्यात पॉईंटच काय ?

राहुल : माझ्या तोंडचे शब्द काढलेस तू..

अविनाश : नको रे मना वाद हा खेदकारी

22225 10.12.84

नको रे मना भेद नाना विकारी.

राहुल : माफ करा हं पणशीकर, तुमच्या बायकोला 'तू' म्हणून संबोधलं. तशी आमची फारशी ओळख नाही– पण अविनाश इन्सिस्टस्–

पणशीकर : अहो, 'तू' आणि 'तुम्ही' चं काय घेऊन बसलात ? मला हे... हे... काय घडतंय... ह्याची जरा तरी ढोबळ कल्पना द्याल का ?

अविनाश : मना कल्पना कल्पिता कल्पकोटी,
नव्हे रे नव्हे सर्वथा रामभेटी.

पणशीकर : (अविनाशकडे) ह्यांनी तर संन्यासच पत्करलेला दिसतो. आमच्या हिचं एकंदरीत विक्षिप्तच लक्षण, आता तुम्हीच मला सांगा– हे विष प्रकरण काय आहे ?

राहुल : पळवाटीचा मार्ग आहे–

पणशीकर : ह्यांनी तुम्हाला सांगितलं म्हणून तुम्ही एकमेकांच्या पेल्यांत विष टाकलंत ?

राहुल : सांगितलं म्हणजे तसं सांगितलं नाही–

पणशीकर : म्हणजे ?

अविनाश : मना राम कल्पतरू कामधेनू
निधी सार चिंतामणी काय वानू

राहुल : अविनाश डायरेक्टली तसं कधीच सांगत नाही. पण मला कळलं त्यांनी सांगितलं म्हणून–

पणशीकर : मला काहीच कळलं नाही अजून–

कोयना : (पणशीकरला जवळ जाऊन) आज का आलात तुम्ही इथं ?

पणशीकर : का म्हणजे ? दीड वाजेपर्यंत परत येणार होतीस तू– आणि (अविनाशकडे) इथं यायला काय बंदी आहे ?

अविनाश : नाही, मुळीच नाही. घर आपलंच आहे.

पणशीकर : वा, ह्याला म्हणावं आदरातिथ्य. आमच्या हॉटेलातल्या मॅनेजरला काही जमतच नाही हो.

कोयना : आधी फोन तरी करायचा होता–

अविनाश : तुम्ही काही–

पणशीकर : हो, चहा चालेल मला.

अविनाश : चहा ? आता चहा म्हणजे– (वैतागून) कोयना, कॅन यू मॅनेज समथिंग ?

कोयना : तुझ्या फ्लॅटमध्ये चहाची पूड तरी मिळेल का ?

अविनाश : मला काही कल्पना नाही– ट्राय–
(कोयना आत जाते.)

पणशीकर : (विश्वासात घेण्याचा प्रयत्न करत) अ... अविनाश... साहेब ते विष प्रकरण...

अविनाश : हँ हँ...
पणशीकर : (न समजून) हँ हँ
अविनाश : हँ हँ हँ
पणशीकर : (रडकुंडीस) हँ हँ हँ
अविनाश : नाटक–
पणशीकर : नाटकच होतं ना ? वाटलंच मला.
अविनाश : पणशीकर साहेब, प्रत्येक माणूस हा उपजतच नाटककार असतो–
पणशीकर : (न समजून) अं ?
अविनाश : फक्त एखादा जबरदस्त नाटककार काहींना भेटतो, तेव्हा ते स्वत्व विसरून त्याच नाटककारानं लिहिलेल्या भूमिका खऱ्या जीवनात देखील बजावू लागतात–
पणशीकर : हँ
अविनाश : हँ हँ
पणशीकर : हँ हँ हँ
अविनाश : हँ हँ हँ हँ
पणशीकर : अखेरीस नाटक हे नाटकच, काय ?
अविनाश : काय नाटक आहे, काय सत्य आहे, हे प्रत्येकाच्या समजण्यावर आहे.
पणशीकर : वा, साहेब, तुम्ही तत्त्ववेत्ते वगैरे आहांत वाटतं. आमची ही नेहमीच स्तुती करत असते आपली. पण– तुमच्या त्या विघ्न प्रकरणाने मात्र काही वेळ घाबरूनच सोडलं.
अविनाश : आता नाही भीती वाटत ?
पणशीकर : छे, आता का म्हणून ?
अविनाश : भीती संपली की एक्साइटमेंट पण संपते, नाही ?
पणशीकर : काय ?
अविनाश : काही नाही, बसा–
पणशीकर : (खुशीत) अवश्य. (बसतो) अविनाश साहेब– आमची... ही... ऑफिसचं काम वगैरे व्यवस्थित करते ना- नाही म्हणजे– मला आपलं उगाचच वाटतं की ह्या वेळी कसलं काम– नाही तसं म्हटलं तर काम असतं मोठ्या माणसांचं– रात्री अपरात्री– म्हणजे– देवेच्या मोठ्या माणसांच्या कामाशी काहीच संबंध नाही-
अविनाश : पणशीकर, तुम्हाला एक्झॅक्टली काय विचारायचं आहे ?
पणशीकर : हेच की, आमची ही इतक्या रात्री इथं कशाला– नाही, म्हणजे—
अविनाश : नाही, म्हणजे तुमच्या प्रश्नाचा रोख मला कळला.
(आत हाक मारून) कोयना–

पणशीकर : अहो हे काय करता ? तिला कशाला बोलावता ?

अविनाश : हे पाहा पणशीकर, असं एखाद्या व्यक्तीबद्दल पाठीमागून बोलायची सवय नाही मला.

पणशीकर : ठीक आहे, प्रश्नच राहिला आमचा–

कोयना : (प्रवेशून) मला हाक मारलीत ?

अविनाश : हो, आपले–

पणशीकर : (अविनाशला तोडून) चहा होतोय ना ?

कोयना : चिमूटभर पूड सापडली मला– किती शतकांपूर्वीची आहे कोण जाणे–

पणशीकर : वा, जुन्या पुडीचा वास फार स्ट्राँग सुटतो. हे बघ, जरा आलं सापडलं तर लाव हं चहाला-

कोयना : कळलं. (आत जाते.)

पणशीकर : (राहुलला) तुम्ही पण घेणार ना चहा ?

राहुल : मला म्हणालात ?

पणशीकर : हो.

राहुल : नाही.

पणशीकर : हॅ हॅ हॅ. तुम्हीपण आमच्या हिच्यासारखेच वाटतं. (बोटाने दारूच्या बाटलीची खूण करतो.) चालायचंच. चालायचंच. (अविनाशला) आणि तुम्ही ?

अविनाश : ह्या फ्लॅटमध्ये बेकायदा प्रवेश केल्याबद्दल तुमच्यावर इंडियन पीनल कोड खाली कलम ३७२ व ३७२ अ अन्वये आरोप ठेवण्यात येत आहे. आरोपीला त्याच्या पिंजऱ्यात नेण्यात यावे.

पणशीकर : पण पण... (राहुल पणशीकरला पिंजऱ्याकडे नेतो.)

अविनाश : आरोपी पणशीकर, तुम्ही तुमच्या बचावासाठी वकील नेमला आहे का ?

राहुल : (पुढे येऊन) एस, युअर ऑनर, आरोपीच्या वतीने मी माझे वकीलपत्र देत आहे.

अविनाश : आरोपीला आपला गुन्हा मान्य आहे का ?

राहुल : यॅस युवर ऑनर.

पणशीकर : काय ?

राहुल : आरोपीला आपला गुन्हा मान्य आहे. पण आरोपीने केलेला बेकायदेशीर प्रवेश हा त्याच्या स्वतःच्या, एकुलत्या एक बायकोच्या शोधासाठी केला होता. त्याच्या बायकोनं त्याला अमूक वाजता येईन असं कबूल केलं होतं, पण ती वेळेवर परतली नाही. म्हणून आरोपी काळजीने व्याकूळ होऊन आपल्या एकुलत्या एक बायकोच्या शोधार्थ निघाला. म्हणून बचाव पक्षाचं असं म्हणणं आहे मिलॉर्ड की, आरोपीला सौम्यातील सौम्य शिक्षा देण्यात

यावी.

अविनाश : निर्णय घेण्याअगोदर आरोपीच्या बायकोची साक्ष घेणे आवश्यक आहे.

राहुल : आरोपीची बायको हाजीर हो.

कोयना : ( हातात कप घेऊन प्रवेश करत ) चहा.

राहुल : मिलॉर्ड आरोपीला चहा देण्याची परवानगी देण्यात यावी.

अविनाश : परवानगी आहे. द कोर्ट इज अॅडजर्न्ड टिल देन.
(पणशीकर बशीत ओतून हळूहळू चहा पिऊ लागतो.)

पणशीकर : (खोटे हसण्याचा प्रयत्न करत ) वा, वा, काय छान चहा आहे- अविनाशसाहेब, आमच्या बायकोचा हातचा चहासुद्धा तुम्ही एकदा- ( अविनाशकडून प्रतिसाद नाही म्हणून खजील ) मी तिचा नवरा असून-सुद्धा तिच्या चहाची स्तुती करतो म्हणजे तो खरोखरच चांगला असला पाहिजे, काय ? हँ हँ. (एकटाच हसतो. कोणाकडून प्रतिसाद नाही म्हणून खजील)

अविनाश : आरोपीला सांगण्यात यावं की कोर्टाचा जास्त वेळ बरबाद करू नये.

राहुल : आरोपी महाशय, चहा लवकर प्यावा.

पणशीकर : आरोपी ? कोण आरोपी ? ओह, मी होय ? (खोटं हसून) काय चेष्टा करता हो गरिबाची ?

अविनाश : प्रोसीड मिस्टर डिफेन्स कौन्सेल. (न्यायाधीशाच्या खुर्चीवर बसतो.)

राहुल : यॅस मिलॉर्ड. ( कोयना कप घेऊन जाऊ लागते.) अवर ओन्ली विटनेस इज मिसेस कोयना पणशीकर- (कोयना थबकते.)

अविनाश : टेक द स्टँड, मिसेस पणशीकर, (कप ठेवते. 'स्टॅन्ड' घेते.) येस मिस्टर डिफेन्स कौन्सेल-

राहुल : मिसेस पणशीकर, तुम्ही तुमच्या नवऱ्याला दीड वाजेपर्यंत येईन असं कबूल केलं होतं ?

कोयना : हो.

राहुल : मग, का गेला नाहीत ?

पणशीकर : ( राहुलला) अहो, जाऊ द्या हो, मला त्याचं एवढं-

राहुल : (पणशीकरला) शांतता —

अविनाश : कोर्ट चालू आहे. ( थोड्या वेळाने) येस मिसेस पणशीकर, का गेला नाहीत ?

कोयना : मला... मला... वेळेचं भान नाही राहिलं-

अविनाश : कसं नाही भान राहिलं ?

कोयना : ( अविनाशला ) तुझ्या घरी कसं राहायचं वेळेचं भान-

अविनाश : मिसेस पणशीकर, सांभाळून बोला. नाहीतर कंटेम्प्ट ऑफ द कोर्टखाली

तुमच्यावरही खटला भरण्यात येईल.

राहुल : बाईच्या बोलण्याचा आपला उपमर्द करण्याचा उद्देश नव्हता, मिलॉर्ड.

कोयना : (राहुलला) यू रॅट, – यू नीडन्ट डिफेण्ड मी.

राहुल : शांतता–

अविनाश : कोर्ट चालू आहे.

राहुल : आणि म्हणूनच, मिलॉर्ड, आरोपीने खूप वाट पाहिली, आपली बायको वेळेवर आली नाही म्हणून तो काळजीनं व्याकुळ झाला–

अविनाश : आणि त्यातून आरोपीच्या लग्नाचा तो पहिला वाढदिवस होता.

पणशीकर : (चमकून) तुम्हाला काय माहीत ?

अविनाश : तुम्हाला आठवण होती ?

पणशीकर : होती तर–

अविनाश : मग आपल्या बायकोला बोलला नाहीत ते–

पणशीकर : (लाजून) तिच्या तोंडून ऐकायचं होतं ते मला.

(अविनाश हसतो.)

राहुल : या सगळया गोष्टी लक्षात ठेवून, आरोपीच्या बेकायदा प्रवेशाची पार्श्वभूमी लक्षात घेऊन, माझी अशी विनंती आहे, मिलॉर्ड की आरोपीला सौम्यातील सौम्य शिक्षा व्हावी.

कोयना : (गंभीर) मिलॉर्ड, आरोपीला इथं येण्याची काहीच आवश्यकता नव्हती. मी आरोपीला चांगली ओळखते. माझी काळजी वाटली म्हणून आरोपी इथं आला, असं म्हणणं म्हणजे एक प्रचंड जोक आहे. मी इथं काय काय करते, याची आरोपीला पूर्ण कल्पना आहे. कोणत्या दिवशी मी या फ्लॅटच्या मालकाच्या कुशीत निजले आणि कोणत्या दिवशी निजले नाही, याची नोंद माझ्या नाही, आरोपीच्याच डायरीत सापडेल. इथून घरी गेल्यावर माझा पहिला अर्धा तास नेहमीच आरोपीच्या प्रश्नांना उत्तर देण्यात जातो. आज आरोपी इथं आला– तो मी इथं काय करते हे माहीत असूनही स्वतःच्या डोळ्यांनी बघण्याचं कुतूहल भागवण्यासाठी आला. या फ्लॅटमध्ये एकदा प्रवेश केला की काय किंमत द्यावी लागते याची आरोपीला कल्पना नाही. तरीपण, मिलॉर्ड, माझी अशी विनंती आहे की आरोपीला कोणतीही सहानुभूती न दाखवता कटोर शिक्षा व्हावी.

अविनाश : (राहुलला) मिस्टर डिफेन्स कौन्सेल, हा तुमच्या बचाव पक्षाचा विटनेस आहे की प्रॉसिक्युशनचा ?

राहुल : काही सांगता येत नाही, मिलॉर्ड.

अविनाश : ठीक आहे. मी शिक्षा जाहीर करतो. ती सौम्य का कठोर, हे आपलं आपण ठरवावे. आरोपीला आमच्यासमोर आणण्यात यावे. (राहुल

आणतो व जरासा ढकलतो. पणशीकर आडवा पडतो. तसाच राहून)

पणशीकर : साहेब, जाऊ द्या मला– माफी मागतो मी– साहेब–

अविनाश : आरोपीला सरळ उभा करण्यात यावे. ( राहुल करतो.) आरोपीवरचा गुन्हा संपूर्णतः सिद्ध झालेला आहे. त्याबद्दल आरोपीला तीन कलमी शिक्षा ठोठावण्यात येत आहे. पहिले कलम– दहा उठाबशा काढणे ( पणशीकर काढतो) दुसरे कलम– ' मी मूर्ख आहे ' असं म्हणत या खोलीत तीन प्रदक्षिणा मारणे–

(पणशीकर आधी बावचळतो. मग ' मी मूर्ख आहे ' असे खालच्या पट्टीत म्हणायला सुरवात करून हळूहळू आवाज चढवून प्रदक्षिणा घालतो. शेवटच्या प्रदक्षिणेनंतर कोलमडतो. इतर तिघे अगदी स्तब्ध. नजर एकाच ठिकाणी ).

अविनाश : पणशीकर, तुमच्या शिक्षेचं तिसरं कलम अजून राहिलं आहे.

पणशीकर : साहेब, मला जाऊ द्या.

अविनाश : आरोपीला उभे करण्यात यावे (राहुल करतो.)

तिसरे कलम– आमच्या सगळ्यांच्या देखत, आताच्या आता आपल्या बायकोशी शृंगार करणे.

(कोयना चकित. मग हसू लागते. वेड्यासारखी हसतच राहते.)

पणशीकर : (अतिशय भेदरून) नाही साहेब... नको... तेवढं मला सांगू नका. मी पाया पडतो, तुमच्या... खरंच...

अविनाश : का हो, पणशीकर, तुमचीच बायको आहे ना ती ? लाजता काय ?

पणशीकर : साहेब, कृपा करा माझ्यावर– मला जाऊ द्या—

अविनाश : (लाडात) पणशीकर, आम्ही इथं आहोत म्हणून भीड वाटते ना तुम्हाला मग आत जाऊ शकता, तेवढी परवानगी देतो मी तुम्हाला– काय ?

पणशीकर : साहेब, राहू दे.

अविनाश : (ओरडून ) राहू दे काय ? (कोयनाला ) कोयना, आत जा, (कोयना जोराने हसते व जाते.) (लाडात ) पणशीकर, तुमची बायको तुमची वाट पाहतेय (ओरडून व पणशीकरला आत ढकलून ) अरे जा–

( पणशीकर धडपडत विंगमध्ये पडतो. अविनाश विंगमध्ये पाहत उभा राहतो. राहुल हसतो. त्याला पण पाठमोऱ्याच )– शटाप. ( काही वेळ तसाच. मग, शांतपणे) राहुल, चॅकॉस्की लाव (राहुल लावतो– फार मोठ्याने ) हळू कर. ( करतो. राहुलची वाढती बेचैनी. इकडे तिकडे भटकतो.) आता तुला काय झालं ?

राहुल : (बेचैनच) काही नाही.

अविनाश : जरा बाटली पास कर (करतो.) तूही घे.

राहुल : नको.

अविनाश : राहिलं. (अविनाश विंगमध्ये बघतो. राहुल वैतागून गॅलरीत जातो. त्याच्याकडे वळून शांतपणे) राहुल, काय आहे बोल ? इतका अस्वस्थ का तू ? (राहुल वळतो. पण बोलत नाही.) आपण दोघे एकटेच आहोत. हा सहवास (थांबून) नकोसा वाटतो ?

राहुल : (घाबरून) नाही, असं नाही–

अविनाश : (हसून) मग एवढं घाबरायला काय झालं ? ये, आपण रमी खेळू- (राहुल पत्ते आणतो. दोघे कट्ट्यावर बसतात. गडद रंगाचा स्पॉट. अविनाश पत्ते वाटतो. दोघे पत्ते लावतात. खेळायला लागतात. थोड्या वेळाने राहुल पत्ते खाली ठेवतो– )

अविनाश : काय रे, आता परत काय झालं ?

राहुल : अविनाश–

अविनाश : यॅस–

(राहुल दोन्ही हातांनी भरभर अविनाशच्या चारपाच थोबाडीत मारतो. अविनाश चकित. दीर्घ स्तब्धता. मग अविनाश हसतो. दिलखुलास)

अविनाश : एवढंच ना ? (पत्ते उचलून) हां, खेळ, तुझी टर्न आहे. (पुन्हा खेळू लागतात. थोड्या वेळाने अविनाश पत्ते खाली ठेवतो व राहुलकडे बघतो. राहुलच्या ते लक्षात येताच तो घाबरतो.)

राहुल : नको. अविनाश... अवि... प्लीज...

(अविनाश थांबत नाही. राहुलच्या खांद्याचा चावा घेतो. राहुल डोळे मिटतो. थोड्या वेळाने उघडतो आणि दचकून- )

अविनाश...

अविनाश : (उठून) काय आहे ?

राहुल : ते आले आहेत–

अविनाश : ते कोण-

राहुल : कोयना आणि–

अविनाश : पणशीकर पण आले आहेत ?

राहुल : हो, आले आहेत.

अविनाश : (पणशीकरला न बघताच) त्यांना सांग, आपला रक्तबंबाळ चेहरा पुसून या–

(स्पॉट जातो. संपूर्ण प्रकाश. कोयना व पणशीकर कोपऱ्यात उभे. पणशीकरचा चेहरा रक्ताने माखलेला– नखांनी ओरबाडलेला. अविनाश अजून सगळ्यांकडे पाठ करूनच उभा. पणशीकर कोसळून गुडघ्यावर बसतो.)

राहुल : (पणशीकरकडे) कोणी ओरबाडला हा चेहरा तुमचा- को...

(सोडून. अस्वस्थ) का, कोयना का ? (कोयना शांतपणे पणशीकरकडे रुमाल फेकते.)

राहुल : (अचानक लक्षात येऊन घाबरून. कोयनाला.) अविनाश ?

कोयना : (कोयना मानेने 'हो' म्हणते. मग एकदम आठवून) नाही म्हणजे– मी...मी...म्हणजे अविनाशनं तसं सांगितलं नाही त्यांना ओरबाडायला... (धाप टाकून) तरी पण...

राहुल : (लक्षात येऊन, उद्वेग) तरी पण– तुला– कळलं–

कोयना : हो.

अविनाश : बघत काय बसला नुसते ? मदत करा पणशीकरांना– आरामखुर्चीत उचलून ठेवा त्यांना– त्यांना विश्रांतीची आवश्यकता आहे. (दोघे पणशीकरला उचलून आरामखुर्चीत ठेवतात.) धिस कॉल्स फॉर सेलिब्रेशन. स्कॉच कुठाय ? (राहुल बाटली व दोन ग्लास आणतो.) कोयना, तुला नको ?

कोयना : नशेच्या पडद्याची गरज नाही मला. असल्या दृश्याची सवय आहे.

अविनाश : (दबलेला आवाज, पण दम देत) कोयना, इकडे ये (जाते) नशेच्या गरजेचा प्रश्न नाही हा– तुझा घसा बघू– (तिचे केस खेचतो– ती 'आ' करते) कोरडा ठणठणीत पडलाय (स्कॉच घशात ओततो.)

राहुल : (ग्लास पुढे करून) अविनाश.

(अविनाश बाटली पुढे करतो मग– एकदम राहुलच्या ग्लासापासून दोन इंच पुढे धार सोडत मागे मागे जातो. राहुल कुत्र्यासारखा जीभ बाहेर काढून अविनाशबरोबर, ग्लास पुढे करून जातो. शेवटी अविनाश त्याला लाथ घालतो. राहुल केकाटत कोपऱ्यात जातो. अविनाशला दया येते. बाटली घेऊन राहुलला कुत्र्यासारखा गोंजारतो. राहूल खूष. स्कॉचचे दोन थेंब त्याच्या ग्लासात टाकतो. राहुल चाटत राहतो. अविनाश मधल्या टेबलावर चढतो. स्पॉट)

अविनाश : मी फार विचित्र माणूस आहे, वाईट माणूस आहे. देवा, (थांबून आठवून येशू ख्रिस्ताची पोज घेऊन, मोठ्याने) देवा मला क्षमा कर– मी काय करतोय ते मलाच कळत नाही– (थोडा वेळ स्तब्धता. मग कोयना व राहुल टेबलासमोर गुडघ्यावर बसून 'आमेन' म्हणतात. संपूर्ण प्रकाश.) (थोडा वेळ तशीच पोज. मग एकदम 'येशूची' पोज सोडून राहुल व कोयना यांच्या गळ्यांत असलेले अदृश्य दोरखंड लगामासारखे पकडतो. माकडवाल्यांचं बडबडगाणं म्हणतो. कोयना विरहाने व्याकुळ झालेल्या माकडिणीसारखी व राहुल लढाईवर गेलेल्या माकडासारखे नाचतात. अविनाश गाण्यातच माकडांची गोष्ट सांगतो. मधून मधून आरामखुर्चीवर निपचित पडलेल्या पणशीकरला दोन्ही माकडे सतावतात. वाकुल्या दाखव-

तात. गाणे संपल्यावर अविनाश बाटलीच तोंडाला लावून पितो. पणशीकर-कडे लक्ष. त्याच्याकडे जातो. कोयना व राहुल घाबरून जातात. काय होणार हे बघत राहातात. अविनाश परत एक घोट घेतो व उरलेली दारू पणशीकरवर ओततो. पणशीकर खडबडून जागा होतो.)

(पणशीकर भयंकर भडकलेला आणि अविनाश अत्यंत खेळकरपणे, मिष्किलपणे)

अविनाश : पणशीकर.

(पणशीकर पुढे येतो. पण गप्प)

पणशीकर ? घाबरलात ?

पणशीकर : नाही.

अविनाश : रागावलात ?

पणशीकर : नाही. (एकदम मूड बदलून) मानलं तुम्हाला–

अविनाश : (अतिशय आनंदाने) खरंच पणशीकर ? इंटरेस्टिंग. पत्ता लागला ?

पणशीकर : लागला.

अविनाश : फार झालं काय ?

पणशीकर : सहनशक्तीच्या बाहेर.

अविनाश : पण (कोयना व राहुलकडे बोट दाखवून) यांना नाही वाटत तसं.

पणशीकर : त्यांची सहनशक्ती दांडगी आहे–

अविनाश : (चकित) हा तुम्ही स्वतःहून विचार केला–

पणशीकर : संपूर्णतः स्वतः

अविनाश : पणशीकर, वेळ आली.

पणशीकर : तुमचा अंदाज बरोबर आहे–

अविनाश : (एकदम काकुळतीस येऊन) पणशीकर, प्लीज, आय बेग ऑफ यू– माझी सुटका करा– ऋणी होईन मी तुमचा– मला फार कंटाळा आलाय– मुक्ती हवीय मला– देणार ?

पणशीकर : तुम्हाला मुक्तीच मिळेल–

अविनाश : पणशीकर, यू आर ग्रेट. यू आर टू मच– अरे बघत काय बसला माझ्याकडे – गळा दाबा माझा– मुसक्या बांधा माझ्या– जीव जाईपर्यंत फटके मारा–

पणशीकर : तुमच्या मनासारखं होईल साहेब.

(पणशीकर एकेक पाऊल पुढे टाकतो. अविनाश एकेक मागे. गॅलरीच्या दिशेने)

अविनाश : कमॉन राहुल, कमॉन, कोयना– प्लीज– (कळवळून) प्लीज–

राहुल : अविनाश ?

कोयना : (घाबरून) अविनाश ?

अविनाश : राहुल, कोयना, शेवटच्या क्षणाला घात करू नका– प्लीज– मला फार कंटाळा आलाय– कमॉन– कमॉन–

राहुल : तुझ्या मनासारखंच होईल, अविनाश. (पुढे सरकू लागतो.)

कोयना : अविनाश.

अविनाश : कोयना, घात करू नकोस– अखेरचा क्षण आहे, प्लीज–

कोयना : ॲज यू प्लीज, अविनाश. (पुढे सरकू लागते.)

अविनाश : (बाल्कनीच्या दिशेने मागे सरकत) दॅटस ग्रेट– अजूनही माझ्या नजरेत ताकद आहे. (हसतो)– मी अजिंक्य आहे - विजेता आहे– माझ्या नजर-कैदेतले गुलाम आहात तुम्ही– मी अजिंक्य आहे.
(वेड्यासारखा हसू लागतो आणि– पाठीमागे जात राहतो. स्टेजवर हळूहळू काळोख. गॅलरीत खालून, रस्त्यावरून येणारा उजेड दिसायला लागतो. वळ्याळात तीनचे टोले पडतात आणि अविनाश गॅलरीच्या कठ्ठ्यावरून स्वतःला खाली ढकलून देतो. त्याचा शेवटचा शब्द लांबला जातो. काही क्षणानंतर तो खाली पडल्याचा आवाज येतो. शांतता. स्टेजवर हळू हळू परत प्रकाश येतो. कोयना व राहुल भेदरून गेलेले. बराच वेळ संपूर्ण स्तब्धता. मग–)

राहुल : प् पणशीकर, मी थ् थोडीशी घेऊ ?

पणशीकर : मला काय विचारतोस ?

राहुल : नाही म्हणजे, कुणाला तरी विचारायला पाहिजेच.

पणशीकर : हो, पण म् माझा काय संबंध ?

कोयना : पणशीकर–

पणशीकर : असं काय बघतेस ?

कोयना : तुम्ही सांगा कसं बघू—

पणशीकर : मी काय सांगू ?

कोयना : (काकुळतीने) प्लीज–

पणशीकर : हं ठीकाय, सांगतो– हे हे असं नको बघूस–
(कोयना मान खाली करते) ख् खाली बस (कोयना बसते.)

राहुल : म् मी पण बसू ? चक्कर येतेय–

पणशीकर : (ओरडून) अरे मला काय विचारताय ?

राहुल : खरंच चक्कर येतेय हो मला–

पणशीकर : मग बस–

राहुल : थँक्यू पणशीकर (बसतो.)

पणशीकर : थँक्यू ? अं, हो, हो, मेन्शन नॉट. (स्वतःशीच पुटपुटत) मेन्शन नॉट (मग थांबून, डोळ्यात चमक) राहुल, कोयना– (दोघेही चटकन उभे

राहतात. पणशीकर अस्पष्ट हसतो.) काही नाही, बसा. (दोघेही बसतात.)

कोयना : रेकॉर्डस् लावू काय ?

पणशीकर : नको.

कोयना : सॉरी.

(पणशीकर स्वतःवर खूष. सावकाश सगळयात वरच्या लेवलवर जातो व भाषण देण्याच्या आविर्भावात–)

पणशीकर : सभ्य स्त्री-पुरुषहो, अविनाश हा फार मोठा माणूस होता. अविनाशची आपल्याला संगत मिळाली ही आपल्याच भाग्याची गोष्ट–आपण काही वेळ शांत उभे राहून त्यांना श्रद्धांजली वाहिली पाहिजे. (राहुल व कोयना उभे राहतात.) अविनाशच्या आत्म्यास शांती मिळो.

पणशीकर : ( रिकामी बाटली पाहून ) संपली तिच्यायला. (अविनाशच्या झोकात बाटली गॅलरीतून बाहेर फेकून देतो. फुटण्याचा आवाज येईपर्यंत स्तब्धता. मग शेल्फजवळ जातो. नवीन बाटली काढतो. ग्लास घेतो. ओतू लागतो. राहुलची चुळबुळ.)

राहुल : ( न राहवून ) प...प...पणशीकर...

पणशीकर : (राहुलवर खेकसून) कोण पणशीकर ? आजपासून अविनाश म्हणायचं मला–

राहुल : ( चाचपडत– पणशीकरपासून दूर असलेल्या टेबलावरच्या ग्लासाकडे ) प...प...पण...ब...ब...बरंय, स...सर मला थोडी...

पणशीकर : अवश्य. ग्लास ये इकडे.

राहुल : (वेड्यासारखा, आनंदाने, ग्लास घेतो व पणशीकरकडे जातो.) थँक्यू सर– ( अगदी अविनाशच्या अविर्भावाने पणशीकर राहुलच्या ग्लासच्या पुढे दोन इंच जमिनीवर व्हिस्की ओतत पुढे पुढे चालतो. राहुल कुत्र्यासारख्या त्याच्या मागून चालतो. शेवटी दोन थेंब ओततो. राहुल ग्लास चाटत बसतो. )

पणशीकर : कोयना, ये, तू पण घे जरा–

( कोयना अजून भांबावलेलीच. ) घे ग, जरा मोकळं मोकळं वाटेल.

(कोयना न राहवून पणशीकरला मिठी मारते व रडू लागते. पणशीकर तिच्या केसातून प्रेमाने, शांतपणे हात फिरवतो. काही वेळाने अचानक तिचे केस खेचतो व अविनाशच्याच पद्धतीने–) रडू नकोस कोयना, तू कधी रडायचं, कधी हसायचं, हे ठरवायचा अधिकार या अविनाशला आहे. तुला नाही ( ढकलून ) जा, थोडी जिन आणि लाइम घे बरं वाटेल– तोपर्यंत...तोपर्यंत ( अस्वस्थ ) तोपर्यंत मी जरा आत जाऊन...झोप लागते का प्रयत्न करून पाहतो– माझ्या गोळ्या कुठंयत– ( कोयना गोळ्या

व ग्लास देते. गोळी तोंडात टाकतो. वरून पाणी पिणार– इथे सर्व 'फ्रीझ')

– पडदा –

'षड्ज' या नाटकाचा प्रथम प्रयोग
उन्मेष युवक प्रायोगिक नाट्यमंच, मुंबई या संस्थेने
दि. ९ नोव्हेंबर १९७१ रोजी तेजपाल नाट्यगृह, मुंबई येथे सादर केला.

प्रथम प्रयोगाचे मानकरी :

दिग्दर्शन : दिलीप कोल्हटकर
नेपथ्य व प्रकाश संकल्पन : अमोल पालेकर
ध्वनी संकल्पन : विनोद दोशी

कलाकार

अविनाश : जयराम हर्डीकर
कोयना : अनुया पालेकर
राहुल : सुबोध गाडगीळ
[illegible]ाकर : डॉ. सुहास घोलकर

फक्त अविनाशला ( आणि प्रेक्षकांना ) दिसणाऱ्या पण संहितेत नसलेल्या एका आंधळीची भूमिका केली होती आशा गोळे यांनी.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. 222225 नों. दि. 10.12.88
वि. ...... क्र. ......
IRBK-0122225